म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.

# कल्पना

कवि :- सदानंद घोणे



REFBK-0021724

२५९५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

**सूचना** :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

[क्र. मा. प]

ॐ आदिमा प्रकाशन
अर्पिते
श्री कुलस्वामिनी
भगवती भैरवी–भवानी देवी
तव चरणी

# कल्पना

सदानंद घोणे

REFBK-0021724
REFBK-0021724

ॐ आदिमा प्रकाशनातर्फे
प्रकाशिका :–
**श्रीमती सरस्वतीबाई लक्ष्मण घोणे**
नियाझ चाळ, खो. नं. ३४,
प्लॉट नं. २६, मेघ वाडी,
स्क्वॉटर्स कॉलनी रोड,
जोगेश्वरी (पूर्व), मुंबई–६७
प्रथम आवृत्ति–२६ मार्च १९७७

**सदानंद घोणे**
ॐ आदिमा प्रकाशन
श्री प्रसाद निवास,
खो. नं. १८,
गणेश नगर,
भांडुप, मुंबई ७८

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन

**किंमत पधरा रुपये**

मुद्रक :– संतोष प्रिंटिंग प्रेस,
पनवेल, नवीन मुंबई.

मुखपृष्ठ : डी. जी. सावंत

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | स्मरण–आई | १ |
| २) | प्रस्तावना | २ |
| ३) | मानवंदना | ८ |
| ४) | पट–कमल अनोखी | १० |
| ५) | 'कल्पना फड' | १२ |
| ६) | आशिर्वाद | १६ |
| ७) | सूरमणि | १७ |
| ८) | सूर्य–नारायण | १८ |
| ९) | कैवल्य धाम | १९ |
| १०) | संतीण | २० |
| ११) | उदे, उदे ग अंबाबाई | २१ |
| १२) | जय मल्हार | २२ |
| १३) | जेजुरी | २९ |
| १४) | प्रीत मोहरली (१) | ३० |
| १५) | ,, (२) | ३१ |
| १६) | रंग हिरवा | ३३ |
| १७) | दोन जीवांचे ऐक्य | ३५ |
| १८) | विडा | ३६ |
| १९) | गडकरी-शायरी-विडा | ३७ |
| २०) | कल्पने गडे ! | ३९ |
| २१) | सुरकुळीची मी सुरांगना | ४० |
| २२) | कल्पना | ४३ |
| २३) | ओवाळू त्यांना आरती | ४४ |
| २४) | कल्पना–प्रतिभा–भावना | ४५ |
| २५) | मोक्षच कि साकारला होता | ४६ |
| २६) | दार उघड | ४७ |
| २७) | मोहर कल्पनेची | ४८ |
| २८) | एक कालीदास | ४९ |
| २९) | कल्पना–सम्राट | ५० |
| ३०) | 'कला–चतुर' कवि | ५१ |
| ३१) | 'कल्पना–पुण्याई | ५२ |
| ३२) | कल्पनेस अमरत्व आले | ५३ |
| ३३) | कोडे | ५६ |
| ३४) | नांदू सौख्य भरे | ५७ |
| ३५) | अतूट नाते | ५८ |
| ३६) | बंध कल्पनेचे | ५९ |
| ३७) | कविता जन्मेच इथे ! | ६० |
| ३८) | लालित्य नवनित | ६१ |
| ३९) | सागर–मंथन | ६२ |
| ४०) | कोणी एक कोळी | ६३ |
| ४१) | जीवनयशअश्व | ६४ |
| ४२) | कल्प–मूर्ति | ६५ |

## अनुक्रमणिका–२


४३) कल्प–तरू ६६
४४) अश्वत्थ ६७
४५) चिरंजीव ६८
४६) अलौकिक शक्ति ६९
४७) कल्पना–प्रतिभा ७०
४८) काळलाटा ७१
४९) फुले काव्य ७२
५०) काव्य ७३
५१) गंगा–गीता ७५
५२) 'फूल' ७६
५३) कल्प–ठाव ७७
५४) कल्पना–कृति ८८
५५) कल्पना–विडंबन (१) ८९
५६) ,, (२) ९०
५७) ,, (३) ९१
५८) 'जाई–जुई कळ्या' ९२
५९) प्रतिभा ९३
६०) भावना १०६
६१) विचार १२०
६२) काव्यलता १२४
६३) कवियित्रिस १२५
६४) गडकरी घ्याहो पुन्हा जन्म तरी १२६
६५) गडकरी कमलेश्वरी १२८
६६) वास मोगऱ्याचा १२९
६७) किती 'तरी' १३०
६८) वाट १३२
६९) लपत, छपत ये ना ! १३३
७०) ये, ये, कविते ये ! १३४
७१) कविता राणी १३५

## 'स्मरण – 'आई'

काव्य – धारा स्त्रवुनि
पान्हा पाजुनि
फुलल्या 'कल्प - धारा'
बहरल्या 'विश्व - कल्पी'

गीता माई
कृपा करावी
करुणा भाकी
बाळ आई

कृपाछत्र धरी
लोभ ठेवि
तुझिया चरणी
मस्तक नमवि

# प्रस्तावना – पाळणा

श्रीदेवी विश्व–कमलिनी
मढवि कमल-पुष्पे पाळणा
श्रीदेवी शारदा उघळी
कुंकुम - गुलाल तिलका

२ श्रीदेवी लक्ष्मी उघळीत
येई चौफेर राजवैभवा
श्रीवनदेवी जागवि
स्वकरी रात्रंदिन पाळणा

श्रीदेवी कुलास्वामिनी हस्ते अर्पि
श्रीदेवी शीतला 'काव्य – बाळा'
श्रीदेवी शीतला ओटी घेई
आज दिनी नवबाळा 'कल्पना'

४ श्रीदेवी तुळजापूर भवानी माता
रक्षि खड्ग धरुनि हस्ता
देव कुळींच्या देव-देवींनो
कृपाछत्र,आशिश द्यावा मम 'काव्य–बाळा'

## पाळणा

'कल्पना' हलते पाळणा
झुलते झालर 'भावना-प्रतिभा'
गाई अंगाई वारा
धरी राजछत्र लतिका

न्हाऊ घाली सरिता
कावड वाही किनारा
सुतारपक्षी शिवी अंगडा–टोपडा
माड बांधी शुभम् श्रीफला

आम्रवृक्ष गुंफी तोरणा
आम्र–अशोक पल्लवांचा
बकुळी, झेंडू, मोगरा
केतकी, चाफा, नव धान्यांचा

मैना–साळुंकी आळवि 'गीता'
पोपट–राघू देई हुंकारा
वरटचात चिमणी आणी चारा
जो, जो, रे माझ्या लडिवाळा

चिमणाराणा जागवि पिला
सर्प तया घाली विळखा
शिकारी वधी तत्क्षणा
होई तू चिरंजिव 'काव्य–बाळा'

जो, जो, रे माझ्या लडिवाळा
तान्हुल्या, सोनुल्या, चिमुकल्या बाळा
श्रीदेवी कुलास्वामिनी भैरवी–भवानी
चिरंजिव करी यासि शिवकुळी

माते कुलास्वामिनी अर्पि
मम 'काव्य–बाळा' 'कल्पना'
तव हस्ते श्रीदेवी शितला
माते देवी उदंड करी यासि तव कुशी

५ माता, पिता आणि गुरुविना
'काव्यफूलपाखरु' धुमे मानस–कमला
वाही प्रथमम् 'काव्य–पुष्पम् बालकम्'
तव मंगल चरणी, आज शुभ दिनी

६ मन, बुध्दि आणि चित्त प्रक्षालुनि
अहंकार त्यजुनि लेखणी फुलली
गोड–कडू फळे सहज बहरली
अर्पिली तव कुळी प्रेमभावे स्वीकारावी

७ नमो, नमो, नमोस्तुते माते
श्रीकुलास्वामिनी भैरवी–भवानी देवी
तव कुळी, तव स्थळी चिरंतन व्हावी,
तव कारणी मम लेखणी सतत झुंजावि

८ कीर्ति गावी, स्मरण, चिंतन
तन–मन–धन, काया–वाचा झिजावि
हीच धरी मी 'मनीषा' या उदात्त
मंगल समयी, पावन व्हावी.

## प्रस्तावना

९ जे, जे स्फुरले भाव–कल्प
ते, ते रेखाटले लेखणी
ज्या, ज्या कल्पना सुचल्या
त्या, त्या, आल्या 'कल्पवंशकुळी'

१० गंध–सुगंध तयांचा
ठेवितो आहे अपुल्या चरणी
गुणावगुण तयांचे करणे
आपण स्वच्छंदपणे मनी

११ न धरी लोभ कसला मानसी
आपली प्रांजळमते मजला कळावी
न किंतु खचित बाळगी हृदयी
योग्यायोग्य अभिप्राय लाभेल जनी

१२ ज्या, ज्या समयी नटल्या मानसी
बुध्दि, विचार, मन–हृदयी–
'कल्पना–प्रतिभा–भावना' त्या, त्या
समयी मिळाल्या येऊनि कल्पनासागरी

१३ कल्प-बियांचा आज हा तरु
डौलाने मोहरेल कां रसिका अंगणी?
शब्द रंगवि लेखणी, खुलवि
तेज, ओज, प्रभा भावकल्पांची !

१४ फुले बहरली भावगंधांनी
गडगंज फलमालांनी धरली
गोड–कडू रसांची, पुढे–
मांडिली, चाखुनि घ्यावि.

१५ रसिकता आपुली हौसेने वदावि बहुपरी
काळ, मूहुर्त न धरावा मानसी
आडपडदा, शंका तुम्ही सोडुनि
कौल तुमचा सांगावा मज क्षणी !

१६ जे, जे झरझर स्त्रवत आले
काव्य–पुष्पात ते, ते निवाले
अंतरंग नाना हृदयाचे
विविध भावनात खुलले

१७ प्रतिभेने झळाकले, कणाकणांनी फैलावले
कल्पनेने जटाशिरी धरलेले
विचार–मंथनाने, प्रांजलपणाने,
निसंकोचपणे आपुल्या समोर मांडिले

१८ कल्पा–कल्पाने वाढला कल्पतरु,
फळला भावतरू, फुलला प्रतिभातरु,
ऋणानुबंध तयांचा गुंफिला
कल्पगालाने चढविला शारदा

१९ काल करील उचित मूल्य–मापन
थोर मताचा परिचय येईल आता
मम 'कला–कल्पना' डोळयात आणा
वाणून भावार्थ योग्य निवाडा द्यावा

२० चिरकाल काल 'कला–कवन' गाया
'कल्पना' लिहिण्या, लेखणी रेखाटण्या
'शिव–कृपा'–'धन्वंतरी' आशिशा
रसिकजन कूजन कराया

२१ क्षणाक्षणाने स्मरले, लिहिले,
क्षणाक्षणाने उमलले, फुलले
भावकळयांना जोमात आणिले
'कवन' कराया प्रवृत्त केले

२२ जे, जे सिंचिले कलाकलाने
जे, जे मनपटलावर फवारले
ते, ते तुषाररुपे दूरवर उडाले
'कवन-पंक्तित' स्थानापन्न झाले

२३ गाणे छिन्न-छिन्न भावांचे
मनात सांचले ते खासे
कणकण गोळा करुनि तयांचे
'काव्य-कडबोळे' केले असे

२४ ताल, सूर, ताना एकवटले
फुला-फळांनी 'काव्य' रंगले
मन माझे त्यातच दंगले
'काव्य-लतेशी' खेळू लागले

२५ 'काव्य-पाखरू' उडू लागले
स्वैर नभा धुंडाळू लागले
वेध-शोध घेऊनि आले
दाही दिशातुनि कवनाचे

२६ मेघमाला कल्पांची वर्षते
भावगंगा भराया मन हर्षते
बहरात फुलली प्रतिभाफुले
आनंद गगनात स्वैर खेळे !

२७ स्मरण येतें 'कवि-कालीदासाचे'
'कल्पना' अभिधानम् सार्थ वाटे
'कवन-पुष्पम्' स्मरते तव नामे
हर्षोत्फुले, रोमरोमी शहारे

२८ या सर्वाची झाली गर्दी
मानसास सदा येई गुंगी
भान मनीचे करिते हातमिळवणी
कशास हवी कुणाची पुण्याई !

२९ भिन्नभिन्नरस रत्ने
भिन्नभिन्नरस पाने
चघळुनि तांबुले
विडा–मुखी रंगले

३० उत आले नादानादांचे
खेळ झाले पंचमहाभूतांचे
ब्रम्ह–परब्रम्ह त्यांतच रंगले
'कल्पनेस' माझ्या जाग आले

३१ काव्य–लतेच्या तनूवरती
कल्पनांची रत्ने विखुरली
कवि हृदयी प्रभा उसळली
दृगोचर 'कल्पनांतरी'

३२ मानस–हंस पोहे राजसवाणी
'कल्पना' राजसबाळी तटिनी
धुरंधर 'विचार–रवि' विकसि
सु–मने विपुल बहुगुणावगुणी

३३ सभा मंडप पंडितांचा
महाव्दार विव्दजनांचा
ज्ञानियांची पीठिका
दारात येऊन उभी 'कल्पना'!

सहर्ष स्वागत करीते
ज्ञानियांना पुजिते
मानपानादिकांनी वंदिते
गोड तुम्ही मानुनि घ्यावे!

दिनांक २६ । १ । १९७७

सदानंद घोणे

# मानवंदना

रसगंगेच्या काठावरती कवन दिले तू मला !
वीणा छेडिता, भाव उमलला
सूर जुळविता, ताना चढविता
कमलिनी खुलल्या मानसरोवरा
लयबध्द ताना सुटता डोलविति कमळे माना !

नीर–कलकल–रवावर तरंगा
हंस–नौका विहारत करी जल-क्रिडा
पवन–लहरी वल्हविति नौका
मेघ–मल्हार आळवित राग वर्षे, डोले लतिका !

सौदामिनि–तांडव–नृत्य चालता
उसळला आनंद भरुनि रसकिनारा
मयूरकेका नृत्यासवे साथ देता
भैरवी चराचर घुमवित, मैफल रंगविता !

कवन बहराचा वसंत फुलला
गुलमोहराचा गालिचा विणता
प्राजक्तांचा सडा वर रेखता
धुंद सुगंधित दरवळता दरबार गायनाचा !

२

रातराणी–निशिगंध केवडा दींचा
मोगरा, फुलवरा, गजरा केस संभारा
हार कंठी माणिक–मोती–पाचू–रत्नांचा
हिरवा–चाफा–कंकण, मुद्रिका बोटा छेडिति तारा !

लाल तिलक भाला, उमर फुलला
आबूली, जास्वंदी, बकुळी, पेंडकुळी
आदि काढिति रांगोळी दरबारा
विशाल गगन–चराचर–मंडपी करिति मुजरा !

लाल गुलाब, तेरडा, तिळ, अंबाडी
सूर्यफुले रेखिति स्वस्तिक मानचिन्हा
शब्द–मुकुट घालुनि शिरी देते 'कल्पना' मानवंदना
सरस्वती, शारदे अर्पिते आज तुला कलगी तुरा !

# 'पट-कमल अनोखी'

कल्पना पटावर मन कोवळे
भाव आगळे, लिहिते वेगळे
हृदय-अंतरांतून सदा विणिते
हळव्या भाव-विकारांचे धागे

ललित-यात्रा पद चालिते
प्रतिभा-भावना वाट दाविते
सानुभव वाळवंटी निर्झरी वाहते
तप्त 'मानवी' फुलांना फुलविते

सहृदयतेने तयांना नटविते
रुक्ष-जीवनात 'ललित-मोक्ष' आणिते
निर्झरी काठी 'खजुरी' जीवन
चैतन्य घेऊनि हसत खेळते

पट-कमल अनोखी घेऊनि विकसले
मोर्तब- चुंबन संयोगाचे ठळकसे
मुके असूनही पट-कमल बोलके
जीवनोत्कटता ओथंबुनि वाढले !

२

अर्थ खोल घेऊनि उभे राहिले
प्रेमोत्कटता देऊनि पुढे चालले
एकव्रतकल्पतरू शुभलाभ प्रीतिचे
तीव्र भाव खदखदे सुखद आठवांचे

मानवी मन अनुभवे पूर्णरुप साचे
कपट–अकपट जीवन-लीला रंगते
विरह–वियोग, संग–भंग, मोह-भ्रम
तयातुनि ऐसपैस 'खासे' दर्शविते

## ‘ कल्पना फड ’

डफ फडफडे, थाप डफावर पडता
वाजवि तुणतुणे ‘फडके–प्रतिभा’
होऊनि मुरळी मजसंगे नाचाया
आली दुसरी मुरळी ‘भावना’ नाचाया
करितो शाहिर मुजरा, तुम्हा पुढे रसिका
उधळुनि गुलाल–अबिर भंडारा

पैंजण झुण्झुणे, टाळ किण् किणे
पायी बिजली सळसळे
कोमल कंठातून सूर गूंज उठे
थयथय माझे पाऊल नाचे
पदन्यास ताल–सूरावर पडे
डोई पदर घेऊनि देते मी मुजरा

लेईला भरजरी शालू हिरवा
कमरेला कमरबंद पट्टा चांदीचा
किण् किण हिरव्या चुड्यांचा
ताल–सूर देई तुणतुण्याला
सुरूवात करिते मी वगाला
ध्यान देऊनि ऐका हो रसिका

नाचते, नाचते मी 'कल्पना'
मुरळचा 'प्रतिमा' अन् 'भावना'
वंदन प्रथम करिते श्रीगणेशा
नाचाया येरे बा तू गणराया
तव ईच्छेचा वरद–हस्त मिळावा
तव कृपेने 'कल्प खेळ'–मांडिला

कशिदा शब्द–रवांचा काढिला
वेलबुट्टी रेखिली रसरंगाची
गालिचा मांडिला भावांचा
मांडिते, मांडिते मी 'कल्पना'
गुलाल फेकिते शाहिरीचा
जरीपटका बहाल करिते प्रीतिचा

डोई तुमच्या खोविते मानाचा
माणिक–मोती तुरा हिऱ्यांचा
पागोटी खोविते मोर पिसारा
गोड मानुनि घ्या हो रसिका
महाराष्ट्र– सारस्वत शाहिरा
वाघ्या मुरळी उधळिते सोना यशाचा.

जीवन–कळी रोविते तुमच्या दरबारा
वट–वृक्ष होईल कां सांगा हो चतुरा ?
सुरपारब्या तुमच्या–आमच्या भावाच्या
भिडतील गगना, लाजवितील चंद्र–सूर्या
रोहिणी चांदण्यासवे चमकेल तुमच्या हृदया
खेळेल घरीदारी तुमच्या जाई–जुई वेला

शोभा चांदण्याची फुलविल 'आनंदवना'
लाटा वाऱ्यांच्या आणतिल 'यशोगंधा'
मयूर–मनांचा नाचेल तुमच्या अंतरा
जाणून परीक्षा सांगा हो चतुर–रसिका.
"विचार–सागर गर्जेल चौफेर नभा
यश–दुंदुभि गाईल अखंड कीर्ति–ध्वजा" !

नाचते, नाचते मी "कल्पना"
वैखरी जी स्तवते कवना
गुणगान करिते यशेश–रविला
लेखणी जी गुंफिते कवना
स्मृति जी जागविते "भावना"
श्रोते तुम्ही या हो श्रवणा

'कल्पना-सृष्टी' रचिते जी शारदा
'शब्द-सृष्टी' खुलविते प्रस्तावना
'ईश्वर-सृष्टी' न्याहाळिते रचना
'नवी दृष्टी, नवी सृष्टी, कल्पना-वृष्टी'
या निर्मिति 'अदभुत गोष्टी'
डोलविति, गुंजविति 'नाद-ब्रम्हा'

नाचते, नाचते मी 'कल्पना'
नाचते, नाचते मी 'प्रतिभा'
नाचते, नाचते मी 'भावना'
सारस्वत कुळीच्या 'नर्तिका'

## – आशिर्वाद –

धाव पाव तू सोमनाथा
कैलासिच्या शिवराया
भाग्य–विधात्या धावत या
सौख्य–भस्मा उधळित या

यश–दुंदुभि गर्जत या
दैव–गंगा–जटा धरुनि या
त्रिशूळ, डमरू घुमवित या
दैन्य–दानवा संहारित या

सकल–मंगल–कलश
पार्वती–गजानना सह
नटत, नटत नटेश्वरा
भव सदनी धावत या

या मंगल–नांदी वाजवित
स्विकारा स्तवन–सुमन
या त्रिखंडी यश–शंख फुंकित
या, या, आर्शिवाद द्याया.

## सूरमणि

गणाधिपति, सूरमणि, गणपती
रंगले गायन-नृत्य सभामंडपी
मंत्रमुग्ध श्रोतृगण श्रवुनि--देखुनि
देवादिदेव बैसले मुजरा करुनि

तांडव--नृत्य रंगता सभी
पैंजण रुमझुम छेडता पायी
देवी शारदा वीणा झणकारी
लयबद्ध सूर धरता नाचति सूरमणि
कौतुकें स्तंभित सभागण मंडळी
हर्षले देखुनि शिव-पार्वती !

गंधर्वादि--यक्षगण चकित बापुडे !
साश्चर्य ऋषि-मुनि श्रवुनि गायन स्वर्गिचे
नाद सुरम्य काढता मंजुळ नुपूरें
मृंदग-वीणा धरति साथ स्वये
गौरी-सुत फिरता गरगर वलये
कड् कड् कड् टाळी पडे नृत्यालये !

# सूर्य-नारायण

सुप्रभाती अर्घ्य सोडतो तुजला
उभय कर जोडुनि नारायणा
मित्र: ! सकल जगताच्या कल्याणा
नित्य—क्रमें उगवतोस पूर्वेला !

ऋषि—मुनि, तपी वंदिती तुजला
तेज:पुंज दीप तू नभीं उगवतां
प्रकाश तव सर्वत्र फैलावता
तव ज्योति दूर सारती अंधारां

ज्ञान—ज्योति उजळसि ज्ञानियांच्या मंदिरा
अखिल जगताचा दीप तू खरा, भास्करा
अज्ञान—जळमटें ही नष्टली दिवाकरा
लता—तरु सहर्ष स्वागता तुझ्या ईश्वरा

व्दिज—गण भूपाळी गाती तव आगमना
धेनु हंबरती, सोडति पान्हा वत्सलां
आनंदी आनंद खेळला सर्वत्र भूतलां
उ:षा देवी सज्ज झाली आरती ओवाळाया

सृष्टि हसते तव आगमनी प्रभुवरा
किरण शिरू दे, संपू दे अज्ञान ईश्वरा
ज्ञान—ज्योत अशिच फुलव तू मन्मंदिरा
हीच कर जोडुनि विनंती करतो तुला.

## कैवल्य-धाम

आलिया तुमच्या संगं
कराया तुमची साथ
प्रपंच काळोखी रात
धरू या भक्तिची वाट

शिवनाम अति थोर
करील मार्ग नीट
लयास जाईल भवताप
लाभेल कल्पांती कैवल्य–धाम.

## संतीण

संसार आणि घरदार सोडले
हाती चिपळ्या, पायी पैंजण बांधले
भक्तिचे व्रत खडतर घेतले
बाई मी झाले पंढरपूरची संतीण.

पांडव उतरले रणी, कृष्ण मागुति
बोधिली गीता कुरु–क्षेत्री
जी बनली ज्ञानेश्वरी ज्ञानेशाची
बाई मी झाले पंढरपूरची संतीण.

रसाळ अभंग फुलता तुकिया–मुखी
पांडुरंग ध्यानस्थ होऊनि ऐकती
नामा नाचे किर्तनी, गोरा पारखी
बाई मी झाले पंढरपूरची संतीण.

# उदे उदे ग अंबाबाई

उदे उदे ग अंबाबाई
शेंदुर–उटी उधळली–
तुझिया चरणी
उदे उदे ग अंबाबाई

जगताची तू साऊली
प्रेमाची तू माऊली
लेकराला या तू संभाळी
उदे उदे ग अंबाबाई

ओटी भरते नारळ–खणांनी
टिळा लाविते कुंकवाचा भाळी
माझ्या कुंकवाची तू स्वामिनी
उदे उदे ग अंबाबाई

नवरात्राचा सण मोठा
आनंद ओसंडतो मोठा
तुझ्या नामाचा महिमा मोठा
उदे उदे ग अंबाबाई

मी लेक तुझी सानुली
धावुनि आले तव चरणी
घे मज प्रेमे तव पोटी
उदे उदे ग अंबाबाई

तूच संभाळी जगाचा भार
तू अनाथांचा खरा आधार
कर माझा तू संभाळ
उदे उदे ग अंबाबाई

## जय मल्हार

येळकोट, येळकोट, जयमल्हार
उधळला गुलाल भंडारा
या विश्वाचा तू कैवारी
धाउनि ये लवकरी
मनीची चिंता हरावी
येळकोट, येळकोट, जयमल्हार

भक्तांचा तू उध्दार करी
नवसाला माझ्या पुरा करी
दयेचा टिळा तव अंगी
तव चरणाची धूळ लावि भाळी
येळकोट, येळकोट, जयमल्हार

नाही या जगि मज कुणी
तूच आहेस खरा वाली
तुझी मला आस लागली
घरादाराची ओढ तुटली
येळकोट, येळकोट, जयमल्हार

पैंजण बांधले पायी
नाचते तुझ्या सामोरी
आशिर्वाद द्यावा निज करी
व्हावा माझा उध्दार तव व्दारी
येळकोट, येळकोट, जयमल्हार

जेजुरी नाव लई थोर
तव नामाचा चाले गजर
प्रेम वाहे खळखळ अपार
नाचे थयथय भक्त-गण
येळकोट, येळकोट, जयमल्हार

भाव-पुष्प वाहिले तव चरणी
गोड मानुनि घ्यावे यासी
काया झिजावी तव कारणी
युगे-युगे मी व्हावी तव दासी
येळकोट, येळकोट, जयमल्हार

## देव मल्हारी

जे, जे, वांछिले मानसी कांहीं
ते, ते, पूर्ण होई सत्वरी
अशि ही मायावी नगरी
लाजवि जी इंद्र-नगरी

अवती भोवती दऱ्याकपारी
एक गड वसला सह्यगिरी
नाम जियेचे ते जेजुरी
अपार कीर्ति लाभली विश्वी

वर्णन कराया वाण शब्दांची
पडली अपुरी गाया शाहिरी
अशी ही भूतली अवर्णनीय सुंदरी
नक्षत्रात न तिळभर उणी खनी

गडाची बांधणी चिरेतटबंदी
चमके कळस सोनियाचा वरती
सूर्य–किरणे दिपति पाहुनि
गडाचा स्वामी देव मल्हारी.

गर्जत उंचस्वरे तुतारी
आसमंत शिंग गर्जवि
चराचर वाजवि दुंदुभि
मंगलता झुळझुळे जेजुरी

जेजुरी वाघ्या–मुरळींची पंढरी
भक्तांची वारी सदा पुण्य नगरी
आनंदसुखधाम ब्रम्हांड नगरी
अक्षि नांदतो जनहितरत मल्हारी

इथं नांदतो पराक्रम-नृसिंहरूप मल्हारी
सूत्रचालक - आद्यशक्ती,मल्हारी
मन:शांति, साधना, योगशक्ती, मल्हारी
परमेश्वरावतार चैतन्यशक्ती, मल्हारी

अविरत जलौघ ब्रम्हशक्ती
विश्व उत्पादक प्रचंडशक्ती
स्फुलिंग फुलता प्राण रसशक्ती
साक्षी जेजुरी अक्षि पराशक्ती

गुलाल–भंडारा उधळता सभी
लेवुनि भाविकजन भाळी
मिरवित खंडेरायाची पालखी
कीर्ति गरजति देव मल्हारीची

घोड्यावर स्वारी चिदानंद मूर्ति
सती म्हाळसा माया–शक्ती
अविरत 'कारण आणि कार्य'
नांदते जागृत सदा नियति

निर्गुण 'माया' सगुण ती 'श्री'
रेखिते अनंताच्या पटला आकृति
प्राणी–वस्तूमात्रा सुप्तशक्ती
ती उभी साक्षात म्हाळसादेवी

जगन्नियेता, निर्गुण ॐकार
जो नांदतो आनंद मल्हार
चित्–शक्ती 'शिव' साकार
घडवित विश्वाकार जेजुरी

इच्छाशक्ती वावरे सदाशिव मल्हार
साहस, विवेक, सेवादित नटला मल्हार
बुध्दि, रक्षा, तेज, दमन, स्वरूप-मल्हार
प्रेम, उदारता, राजससमृध्दि, प्रजापति, मल्हार

ज्ञानशक्ती बनुनि उभा 'ज्ञानेश्वर' मल्हार
कर्तव्य-दक्ष, कर्तव्य-पालन आदर्श मल्हार
वामशक्ती मावुनि, माऊली, देव मल्हार
जेष्ठाशक्ती फुलुनि पालनेश्वर मल्हार

देशकालाकार विरहित स्वरुप मल्हार
सर्वाकार, निराकार, व्यापक नित्य मल्हार
प्रकाश, स्वातंत्र्य, क्रिया निजप्रकटीकरण मल्हार
रौद्रीरूप धारूनि ठाकला संहारेश्वर मल्हार

प्राणी-वस्तूमात्रा निसर्गदत्त मल्हार
चैतन्य गाभा नांदे मार्तंड मल्हार
महाकाल बंध-मुक्त भैरव मार्तंड, मल्हार
दृश्यादृश्य स्वरूपी जागता विश्वाकार

चित्-अचित् नाम घेऊनि मल्हार
ऋध्दिसिध्दी अवतार देव मल्हार
परा, अपरा, अविद्या, ज्ञानादि अमर्याद
दृक्, सर्ग, प्रवृत्तिबीजादि मल्हार

उत्पत्ति, स्थिति, लय
निर्गुण-सगुण पाषाण मूर्तित चितारली
इह-परलोक दुवा जोडी जेजुरी
जिथं नांदतो देव उभा मल्हारी

# जेजुरी

देवा तुझी जेजुरी
विश्व-मोहिनी नटली
भक्तिची आंबराई
मोहरानं डंवरली कल्पयुगांती

भक्तगणांनी फुलली
भक्तिनं निनादली
प्रीत चरणी जडली
वसे मनी कल्प-जेजुरी

तन-मन-धन अर्पुनि
कल्पांत सागर तरुनि
जाईन तव नामे उच्चारुनि
अशी तुझी कल्प-युगींची जेजुरी !

# प्रीत मोहरली

(१)

एक रात होती प्रीत मोहरली
खोल दरी उभी खाली भीतिची
डोईस पलंगी घेतली उशी
खेळत होती कुशीत खुषी

गुलकंद मनात कि पिकला
श्वासांनी जो टिपला
राया मला संभाळुनि घेती
कंबर माझी लवचिक थकली

काळजात खुलली गोड शहारी
उरात नवनवतीची उमटली शहाळी
अंगामधे चोळी तटतटली
दंडामधे आली पुंडाई

मनात लाजुनि, भिवुनि चूर
रायांनी चोळी सांडिली दूर
उन्मेष करी लाही, लाही
किती कराल तुम्ही घाई !

## प्रीत मोहरली
## (२)

रात होती दुसरी प्रीत मोहरली
गुलाबराणी शिंपित अत्तर सुगंधी
इष्कराणी सजवित होती शेज फुलांची
खेळत होती ग्रंथी–ग्रंथी मदन-कामिनी

फुलत होती गर्भ नाभीत धुंद कस्तुरी
मी सजले होते शृंगाराने रंभा स्वर्गिची
डुबत होते मी 'कल्पना–मानसरोवरी'
मानस-हंसराणा कुरवाळित होता शेजी

भाव-गंगा उचंबळली, तरंग लाट सळसळली
उन्मेष–कमले फुलली, डोलली, लपली पदरी
पुलक उरात चेतली, रसगंगा खळखळली
नयनात चढली विलासी विषय–अनुरागी

रातीच्या गर्भात, प्रीतिच्या नयनात मदन-कळ अनोखी
गुणरसपान कशिदा अनंगगिरा गुंफित होती
सुरई भरीत होती विषय-मद प्याला शराबी
प्यालें धुंद राती चघळित, चघळित तांबुल मुखी

शहारली नवदल अंगकांती गुलमोहर प्रीतिची
करवंदे होती पिकली नयनी, टपोरी, टपोरी
आम्रलता कि मी न्हातच होते शरद् चांदणी
विषय–भुंगा घालित होता पिंगा शृंगाररसी

टपटपले दंवबिंदु ओघळत आले नयनी
इंद्रधनुरंगात रातीची प्रीत न्हाले शयनी
वस्त्राच्छदनात विरल माया मदना लोळवि
जळली रेशमी नाती श्वासांनी ओळखली

# रंग हिरवा

हिरवा, हिरवा रंगच न्यारा
ढंग आगळा, गडद हिरवा
मनात नाचतो मोर हिरवा
खुलवितो पिसारा हिरवा

हिरव्या रंगाचं नातं हिरवं
हिरव्या मनानं जुळवलं
हिरव्या रंगाची भाषा हिरवी
अन् प्रीतिची भाषा असे का वेगळी ?

गालीचा हिरवा, इथं राया बसा
हितगूज हिरवं मजशी तुम्ही करा
हिरव्या मनपटलावर पोपट कोरा
हिरव्या रंगाचं नातं पक्कं बांधा

मंचकावर हिरव्या घ्या विसावा
रात ही हिरवी मजसंगे जागवा
दाह हिरवा इष्काचा शमवा
मजा जीवनाची हिरवी चाखा

हिरव्या मायेचा अंकुर रुजवा
प्रीतिचं रोपटं हिरवं वाढवा
तीळ प्रीतिचा हिरवा भाळी गोंदा
हिरव्या मिलनाचा पारिजात फुलवा

प्रतिमा हिरव्या प्रीतिची घरात जन्मेल का ?
अन् मजशी जन्मभर तुम्ही नांदाल का ?

## दोन जीवांचे ऐक्य

लाज अंगात चुरली
मन-पणती हृदयी लुकलुकली
नयनात ज्योत पेटली
काजळी धरली गहरी

ओठात शिसारी भरली
कमरेत कळ चढली
हातात मिठी ती आली
धुंदी शिरी तगमगली

मेंदी शिणगाराची खुलली
दोन जीवांचे ऐक्य मिळवुनि
गुलाबी शेजेत खेळली
मनोभाव जुळवुनि निवाली.

## विडा

कळीच्या पानाला लावुनी चुना
सख्याला दिला मी हिरवा विडा
चघळता, चघळता विडा बेफाम झाला
सख्याने हळूच मारला डोळा

नयनांतला अंगार फुलला
काळजाच्या कप्प्यांत खुलला
अंगाला की इष्क-डोंगळा डसला
सखा ग हृदयांतच बसला

अंग जळजळे, पुलकित झाले
मनी मी तर बेफाम झाले
मिटीत पडले अन् बंधच सुटले
हरवुन बसले मी-पणा माझा

झाली अधिर ओढ मिलना
कशी कळेना ग ह्याला
कशी समजावू माझ्या मना
खुपतात मला इष्काच्या खुणा

## गडकरी–शाहिरी–विडा

हिरव्या मायेचा हिरवा विडा
लवंग, वेलची नजरेची
कळीच्या पानात घालुनि
सख्याला दिला मी प्रीतिचा विडा

नजरेचा फिरे भोवरा गरगरा
जिवाला घाली गरगर फेरा
आधार मिळे भित्र्या नजरेला
पापणीच्या पडद्याआड दडण्या

गाली–ओठी गुलाबी शोभा खिले
छातीच्या कंपानं प्रीति खुले
भीति सारखं रूप पहिल्या प्रीतिचे
काजळी नाचे, लवलवे तिरपा डोळा

मानसीचा राजहंस फडफडे
नजर चळचळे, पापणी ढळढळे
नवख्या नजरेचा नेम अचूक बसे
फिरफिरे सारखा माशुक डोळा

जीव वावरे, पदर सावरे
उरी दाटले गुलाबी शहारे
गरगर फिरतीनं नजरेच्या
साठली प्रतिमा या डोळा

उरीची लाज पदरानं पालवे
स्पर्शानं जीव हटे, लगेच नटे
सोळा शिणगाराची वहात रस-गंगा
कांटेरी लेण्यात नाचते थयथया.

## 'कल्पने' गडे !

रंगत, खुलत, चमकत ये ना
गडे ग कल्पने !
पुलकित मेंदुच्या तंतूत ये ना
गडे ग कल्पने !

दिव्य तेज:पुंज भरतोय् जरा
लखलख लहरी स्वभाव तुझा
माझ्या मेंदूत ये तू जरा
नावारूपास आणिन तुला
माझे भाल शिणले ग चाहूल स्मरुनि
कस्तुरीगंधात स्फुरत ये ना
गडे ग कल्पने !
हळूच स्फंदत, स्फंदत ये ना
गडे ग कल्पने !

आता कुठवर फेर मी धरू
डोकं लागलय् सणसणू
सखे नको ग अंत पाहू
माझ्या जोशात जोश ये भरू
माझे शिर तापले ग तुझी याद करुनि
ज्योति-निरंजनात, आरतीत ये ना
गडे ग कल्पने !
दिव्य–दृष्टी झोत फेकित ये ना
गडे ग कल्पने !

# 'सुरकुळीची मी सुरांगना'

कल्पितगंधा मी 'सुगंधा'
सुरकुळीची सुरूप सुर सुरांगना
झरझर पाझरत भाळी आकाश-गंगा
'प्रतिभा–भावना' हृदयी फुलबागा

सूरतरूवरी गोड गाई भाव-कोकिला
मधुर–कूजन करिती पोपट-मैना
पक्षीगण, तरूवेली धरति स्तब्धता
रंगात रंगली संध्या-राणी भैरवी गाता

सूरसरोवरी ध्यानस्थ गान-बगळा
पापणी लवता पकडी धूनतान मीना
सरोवर काठी झरझरल्या सुरावट ताना
नादआवर्ते भैरवी आलाप रंगता

कल्पाकाशी संकल्प-विहंग उडता
कर्मयोग संकल्प मानसरोवरी सोडता
भूवनि मी संचारिते की कल्पद्रुमा
स्वर्गिची मी संपन्न 'कलागुणा'

२

अजात मी कामकल्पलता
वांच्छिता फळते 'कल्पित फला'
लुकलुकति की कल्पांत समई
महाकल्प उगवता समयी

उच्चस्वरा, कंठमधुरा, मी सतार-विणा
तांबूला विविध भिन्नरसी रसिका
लयबद्ध मधुर ललकारी शाहिरा
मोहवि भावकमलभ्रमरा अंतरंगा

मोहक ललना, मोहिनी छंदीफंदीजना
सुंदरी चंद्रकला भ्रमते स्वैर मेघ–मंडला
उधळित चौफेर विपुल शोभा गूढरत्ना
गुंगवि मनाला नयन तारा समयसूचक बाला

विचारगर्भा विद्वत्ता, स्वयंभू मेधा
बहुरंगी, बहुढंगी, सुजानता
अनेक ढंगी, विविध रंगी पराग–केशरा
बहुश्रुतता असे व्यापुनि अनंत–विश्वा !

## ३

गुलाबी शहरा, रेशमी इशारा मनचकोरा
बेहोष, बेफान मदिरा, विलासी कांता रसिका
चमकावित लालसा चातका गगन विहारा
जलशात स्पर्श फुलोरा, स्वप्नरंजना

उदार विमला, ज्ञानविस्तारा, तरल, सूक्ष्म भावुकता
प्रभावी राष्ट्रीय स्वालंबना, स्वदेशी भावना
गळ्यात पुष्पमाला गुणवंता, प्रेमसेवा अपंगा
वीरा गळा कंठा, सुवासिनी गौरीहारा, तिलका

दृढबद्ध शुद्ध पाया एक 'राष्ट्र-कल्पना'
जोश, आवेग, ज्वलंत मनोरचना रचनात्मक कार्या
कल्पकुळी, विचारकळी, अर्थव्यक्ति, लोकाभिरुचि
तिटकारा, बोधता, भावविवशतादि मी 'कल्पितगंधा'

## 'कल्पना'

मी तर साताराची पोर फाकडी
नका हो ठेवू तुमची नजर वाकडी
कसली ही तुमची रीत बेगडी !
मारिता नजरेतून इष्काची पिचकारी
कशाला दाविता फुकट हुशारी, हुशारी !

विषय-भावना, नको ही कल्पना
लगाम खेचा, नका सोडू कल्पना-घोडा
घाला त्याला खोडा, दावणीला बांधा
राया, तुम्ही नका लावू इष्काची वाजी
न तर तुमची होईल फजिती, फजिती !

चला जरा मळ्यामधी फिरु
शाळू हिरवा भाजूनि खाऊ
उसाचा रस घटाघटा पिऊ
चाखू मधाची गोडी, मधाची गोडी
तरी ती तुम्हाला वाटेल थोडी, थोडी !

शेतं झालीं पिवळी, वाऱ्यासंग झुलति
डुलते शेतामधी लक्षुमि, आणा तिला घरी
रासीवर रास चढवा नव धान्याची
योजा कल्पना आज म्होरल्या पिकाची
नांदेल घरी सदा कल्पना सौख्याची, सौख्याची !

तुमची, माझी जुळेल मैत्रि युगा-युगाची
हीच कल्पना नामी धरावी मानसी, मानसी
चढेल धुंदी जीवन-नशेची, जीवन-नशेची
फुलवा कल्प-तरू बहरू दे कल्पनेला, कल्पनेला
दावा कल्पना नव्या युगाची, नव्या युगाची !

## ओवाळू त्यांना आरती

"स्वातंत्र्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे"
जे गर्जती सिंहाप्रती
राष्ट्र मुक्तोद्धारणी निर्धारे जे सांगती
ओवाळू त्यांना आरती

"ने मजसि ने मातृभूमि" आता सागरा
जे सागरा दर्शविती
देशो कारणी उडी जे टाकति सागरी
ओवाळू त्यांना आरती

"चले जाव" या भारती जे देती आरोळी
जे उभे पुढे टाकती
देश–मुक्ति ध्येय हो, संयमे जे गाठती
ओवाळू त्यांना आरती

"जयहिंद" "सिंह–नाद" ज्यांचा निनादला।
उंच स्वरे जे गर्जती
स्वातंत्र्य जिंकण्यास जे देती आत्माहुती
ओवाळू त्यांना आरती

समरांगणी वीर जे पडले धारातिर्थी
जे मातृभूमि रक्षति
छेदून तमा, जे भाग्य–रेषा उजळति
ओवाळू त्यांना आरती

हुतात्मे झाली बालके जी सौभद्रापरी
झुलवू त्यांची पाळणी
रणशूर, रणधीर जे थोर जन्मती
ओवाळू त्यांना आरती

# कल्पना–प्रतिभा–भावना

डोंगर-कपारी 'कल्पना'
झुळझुळ वाहे नदी 'भावना'
सुपिक तीर 'प्रतिभा'
छानदार वाहे जीवन–प्रतापा

'विचार-केंद्र' 'किल्ला'
'तटबंदी' 'कल्पना'
'संरक्षण' 'भावना'
'टेहळणी' 'प्रतिभा'

'विचार' 'जीवन-नौका'
'आचार-संहिता' 'कल्पना'
'साधन-सामुग्री' 'प्रतिभा'
'विलास-सुख' 'भावना'

'मानबिंदु' 'विजयपताका'
'कल्पना-फेटयात' बसावा
'वाहवा' 'भावना'
'प्रतिसाद' 'प्रतिभा'

## मोक्षच कि साकारला होता !

खेळते ही कल्पना लिलया
वैखरी गीत गाते मना
फुलविते विश्व-जीवना
दु:ख नेई अवघे विलया

रंजवि जना लिलया
हसवि, रडवि क्षणाक्षणा
कल्लोळ उठति भाव-तरंगा
आणि लहरी फुटती हर्ष-वाता

मन-कमल हे डोले नादा
नाद ब्रम्हाचे गायन गाता
परब्रम्हाचे रूप देखता
मोक्षच कि साकारला होता !

## दार उघड

दार उघड, दार आता
कल्पने दार उघड, दार
फुलली चंदेरी नवरात
प्रतिभा कोर गगनात

पेला–भर मदिरा, सरई अंबरा
पाज तव करा या हृदया
चेतवि वल्लरी मानभंग हृदया
अमृतच कि दग्ध-मृत हृदया

रुपवती पद्मज़ा, जयाशा
मृगजळासम बघ धनसुधा
छंदफंद त्यजि खुलवि जीवना
ललना का फुका वल्गना ?

धन सुधेचा कैफ विफला
विफल नखरा जगी या
अमृत-मधुरा मनहंसा
जागत जा कल्पने वचना !

# मोहर कल्पनेची

मोहर, कल्पनेची
घेऊनि माला करात
आली आज दारात
गवसणी काळा टोचत

कल्प–फुला–फळांचा
घडाघडांनी बहरला
उपवनी ओसंडला
गायी कोकिल–लतिका

कल्प–कल्पांना उजळणारा
युगायुगांना चेतविणारा
सौदामिनिला लाजविणारा
आकाश–गंगेशी खेळणारा

कल्प–तारे, कल्प–नक्षत्रे
चकाकणारे ध्रुवतारे
विश्व-गूढ वेधित निघाले
चंदेरी नौका पर्यटनी नाखवे

उधळत चालले विश्व–घोडे
सोडू पहाति विश्व–धागे दोरे!

## एक कालिदास

तू कल्पना, मी कविता
प्रीतिचा रंग महाल
नि:शब्ध रातीचा
बहरलेल्या भावांचा

उसासणाऱ्या श्वासांचा
काळजातिल धुमसणाऱ्या
दर्दभरी भावनांचा
कशाला उद्याची बात !

चल, कल्पने ये जवळ
अशी आज एक रात
प्रसव आता तू एक
कविजात कालिदास !

## 'कल्पना–सम्राट'

सजवि सृष्टी–जीवना
दर्शवि उत्तमोत्तम गुणा
रेखि मानव–कुल संपदा
विलासी राज–परंपरा

चित्रांकित समाज–जीवना
नामांकित लेणं मानवा
मानदंड सारस्वत–भंडारा
चिरकाल स्मरण भारत–पुत्रा

खुलवि 'शब्द –कल्पना'
नटवि 'काव्य–कल्पना'
चितारी 'नाटय–कल्पना'
रुजवि 'विश्व–कल्पना'

जिंकी 'काल–वैभवा'
करी अमर 'कवि-कुला'
चिरंजीव 'कल्पना-भूषणा'
प्रणाम 'कल्पना–सम्राटा' कालिदासा

# ‘कला–चतुर’ कवि

कल्पना नाचवि
तोड नाही जगी
शाहिरसमदे बंदे
गाया त्याची कीर्ति !

‘कला–चतुर’ कवि
कालिदास महाकवि
अमर ‘कलाकृति’
काळाची शरणागती !

अजर, अमर, अनंत
दिव्य, भव्य, ज्ञानसंपदा
अमर ग्रंथसंपदा
शाश्वत ग्रंथ भांडार !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

## 'कल्पना पुण्याई'

'कल्पनें' ! तव "कल्पना"
करवत न्हाई, पुण्याई लई
गोडवि तुझी न्यारी
अखंड विशालत्व व्यापी

थोरवी किती ग गावी
काळीज भरतय् लई
हृदय धडधडतय् बाई
तुला स्फुरण चढतय् लई

गरगरत्यात माझं डोळं
दिपत्यात पाहुनि रूप न्यारं
लेखनी शाहीरी थबकतिया
तुला कशाची फिकीरी न्हाई

'कल्पना नामी' ! "काव्य–स्वामिनी"
गायला शाहीर धजत न्हाई
कालीदास लेवी भूवरी
थोरवी 'कल्पना–भादुरी'

## गोविंदाग्रज यांच्या केशवसुत मेले ? .
### ( यांच्या कविते वरुन स्फुरलेल्या खालील ओळी )
### कल्पनेस अमरत्व आले !

कल्पास जागवयाला — कालिदास गाउनि गेले !
"इंग्लंड भूमी" शेक्सपियरची — मायभूमी कालिदासाची
संदेश गोड कल्पनेचे — तरळले, वङमयी जिरले,
तपोवना शारदेच्या — स्मरता मानस फुलले !

गंधर्वांचे हेतु नुरले,
पुढचेच कार्य घडले,
ते येथेंच करुनि गेले

अवतरुनि 'कलि' गेले ! — शाहिर स्मरुनि बोले !

एकेक शब्द बनले — कल्पनांचे जाळे
ज्यांसाठी गंधर्व हटले — ते कल्पकुंभ भरलेले-
वाग्देवीला नटविलेले — कालिदासांनी विणलेले

राजानुभवांनी गुंफलेले
वैखरीने गायिलेले
रोमरोमांतुनि भिनलेले

चौफेर पेरुनि गेले ! — शाहिर स्मरूनि बोले !

'कल्प' उजळवि लेखणी — थेंब-कणांचे कल्पसागर झाले !
आभासाला मूर्तता आली — हो सजिव जे नसलेले !
'कल्पनेस' मरणं नचि येणे — मग 'चिरंजीवच' सदा होणे !

## २

कल्पशब्द सहज स्फुरले !
गूढाला शोधुनि आले !
अज्ञेयास ज्ञेय केले !
'आभासभूत' ईश्वररुप केले !
शाहिर स्मरुनि बोले !

हेंरफेर विरुनि गेले
आस्तित्वहीन, अस्तित्वरुप पावले !
पैलु पाडुनि बुध्दिचे
अदृश्य सदृश्य बनले !
सदृश्याचे मूळच रुजले
कल्पनेचे रोपच रोवले !
भासात 'जीवपण' आणले
काळास हरवुनि गेले
भासास आत्मरुप दिले
कल्प 'कल्पद्रुमच' बनले !
शाहिर स्मरुनि बोले !

जे, जे प्रभाहीन होते
ते प्रभुत्व घेऊनि बसले !
बुध्दिविलासाने खुलले
विद्वजनांच्या मुखोद्‌गत झाले !
'कल्प-विश्व' जे निर्मिले
तेच संस्मरणीय आज बनले !
कुशलतेने लिहिता
शब्द-सृष्टि वहरता
काव्य-सृष्टि उमलता
गाती तयांचे चेले !
शाहिर स्मरुनि गेले !

३

जे शब्द होते
सर्वभूता शिरी तुरे
'आभासविश्व' निर्मिले

सर्वांभूती फुलले
जीवनी तरारले पुष्पगुच्छे
त्यांना कां भूलता गडे !

शब्द लीले विहरता
अचेतना यावी चेतना
सूक्ष्मबुध्दित सुक्ष्मदर्शता

अनुसरति तयांचे चेले

स्मरुनि शाहिर बोले !

त्रिकाली, त्रिस्थळी
स्मरता, स्मरता वाटे
तो विषय होय विधिचा

जिया सतत स्मरावि
सहज 'कल्पना' सुचावि
जन डोले ती लाभता !

जे घर्षणाविना स्फुलिंग फुलले
ठिपकत, ठिपकत लेखणी उतरले
सापेक्षरुप घेऊनि आकारास आले

कालिदास कसले गतस्मृतित बुडाले ?
कल्पनाजगतात कालस्मृतिने जागविले !

# कोडे

कल्पने खेळ गडे
थांवव आता वेडे चाळे
ओजस्वि आपुले जीणे
फुलव रहस्य हे जीवनाचे !

कां भरकटतेस इकडे तिकडे ?
फिर मागे आपुल्या मार्गे
तुझी–माझी जोडी वेगळी
न कळे कुणाला हे कोडे !

# नांदू सौख्य-भरे

कल्पने चल, चल पुढे
कविता आहे मागे
विणते मी धागे-दोरे
जुळविते बंध रेशमाचे !

विश्व हे आपले दोघांचे
नटलेले नाविन्याने
हंसू दे उनाड पोरे
आपण नांदू सौख्य भरे !

# अतूट नाते

कल्पनेने विणलेले
आत्मियतेने बांधलेले
बंधनांनी गुंफलेले
स्निग्धतेने चिकटलेले

कल्पना–सृष्टित जमलेले
अकल्पित घटीं घडलेले
चैतन्य–वृष्टित न्हालेले
प्रीतित मोहरलेले

भाव–गंधांनी फुललेले
जन्मोजन्मी नांदणारे
हें अतुट नाते आपुले
दोघांचे जिवा–शिवांचे !

## बंध कल्पनेचे

बंध हे कल्पनेचे
सैल झाले रेशमाचे
गीत जुळले प्रीतिचे
बेबंद जीवनाचे

तांडव चालले भावनांचे
नाट्य रंगले शब्दांचे
धुंदधुंद जीवांचे
मोकळ्या जीवनाचे

उगवले तारे हे मनाचे
उजळले प्रतिबिम्ब प्रभेचें
लुकलुकले क्षितिज विश्वाचे
पसरले क्षितिजा पलिकडे

सूर रंगले गायनाचे
कल्पना रंगते रंगाने

## कविता जन्मेच इथे !

बंध हे सुटले कल्पनेचे
झेंपावणाऱ्या प्रतिभेचे
नाते जुळले दोघींचे
अकालनिया स्मरणाचे

स्वैर विरहणे दोघींचे
विश्व जिंकण्या मनीचे
अगम्य बुध्दिमत्तेचे
वेष्टण पडले फेरांचे

आकारास जे, ये नवे नवे
विश्वरूप द्याया भावनाते
विश्व उमले कल्पनांचे
कविता जन्मेच इथे !

# लालित्य नवनित

कल्पना दही तळाशी
वाङ्मय रांजणी
लेखणी दोर–रवि
झरझर ते घुसळी

लालित्य नवनित
येई सहज वरवर
माखी रसिक–कृष्ण
दोन्ही करी, मुख

आंबट–गोड माखन
अश्लील–श्लील लिखाण
स्वाद तयाचा चाखुन
दाखवि पसंति रसिक

## सागर–मंथन

वाङ्मय सागरी
कल्पनेच्या अंतरपोटी
शब्द–नवरत्ने विखुरली
तयांची प्रभा पसरली

भावना उभी तीरी
प्रतिभा तशी काठी
घट घेऊनि डोई
तिष्ठत उभ्या दोघी

बुध्दी–मेरु रवि
लेखणी वासुकी–दोरी
'सात्विक–तामसी' कलाप्रेमी
मंथन करिति वाङ्मय–सागरी

श्लीलाश्लील–हलाहलामृत
उपसून काढिली विपुल
भांडत बैसले देव–दैत्य
सात्विक–तामसी

कोणते वदावे 'अश्लील–विष !

## कोणी एक कोळी

शब्द-तंतू गुंफुनि
धागे धागे जोडी
रत्न–जाळी विणी
कोणी एक कोळी

कथा, लघुकथा, पट–कथा
ललित निबंध, नाटयछटा
कादंबरी, काव्यसंपदा
वीरश्री इतिहास, पवाडा

एकांकी, नाटके
प्रवास वर्णने
निसर्ग देखावे
बहारदार कवने

आदि तेजस्वी रत्ने नाना
जडवुनि मौलिक रत्नहारा
नटवि आभूषणे शारदा गळा
सादर करी प्रेमळ रसिका

## जीवन यश अश्व

न फुले जीवन–कल्प कळी
अडखळे, दुर्दैव आडवे
सुळसुळी निसरंडी
जीवनयात्रा इथली.

अंगार फुलता ज्ञानाचा
क्षण येता संधिचा
भरतो आवेश नवजोमाचा
संचारतो उत्साह त्वेषाचा

पुन:रुपि जीवन घेई उसंडी
मन मारी उसळी भरारी
वैभव–धाम बुध्दी धुंडाळी
थेट नेई मन:कल्पित यश–प्रति

कल्पना–कसरत, यश–युगूत
उड्डाण कल्प–युक्ति–गरुड झेप
उतर-घसर–निसर वाट पैलतीर
जीवनयशअश्व काबिज

# कल्प–मूर्ति

उतरंडी, घसरंडी
उसंडी भरारी
अशी कल्पना शक्ति
अमर्याद कल्प–मुर्ति

कल्प-बिम्ब चमके बुध्दी-नभी
भावचित्रे मानस रेखि
मन:चक्षु कोरी दुर्गम लेणी
दुस्तर, दुतर्फा विखुरलेली

खेळे प्रतिबिम्ब खाली
अपरिमित विशाल
विचारसागर पातळी
न्याहाळित बसे विद्वान जनो.

## कल्प--तरू

हित–गूज तेंच
भ्रमर–गुंज हेंच
कमलिनी–मन
फुले एक फूल

दरवळे सुगंध
पसरे परिमळ
कल्पना–मोहर
फळे कल्प–तरुवर

# अश्वत्थ

कल्पनाकार या मूळाचा
वाढे आधाराविना
फुले बहरात अधांतरा
वेध घेता मूळारंभ अंतरा

कवच बुद्धीचे फोडता
उगवे अश्वत्थ भाव-कल्पांचा
श्वासोश्वास चाले अंतरा
शाखा पसरल्या भावना–प्रतिभा

यत्नचक्र रथास जोडता
कल्पनास्वार होता
घोडदौड स्वैर सोडता
टप्प्यात अथांग पसारा

अश्वत्थाची मोहिनी
विश्वाची कांचिनी
सारस्वताची रसवंती
सरस्वती स्वामिनी !

# चिरंजीव

शतशः चिरंजीव जीवन
काव्यातून विश्वाच्या
अगम्या कडून गम्याकडे
रखरखित वाळवंटातून फुलते

अनंताच्या कक्षा ओलांडून
अनंत व्यापक जिवत्व मिरवते
क्षितिजा पलीकडे ओझरून
परलोकांत प्रौढी मिरवते

पाताळ, इहलोक अन् परलोक
त्रिभुवन, त्रिखंड धुंडाळून
चिरंजीवाहून चिरंजीव होऊन
अमरत्व काव्य चौयुगात होते.

# अलौकिक शक्ति

कल्पनेच्या खेळात
प्रतिभा वाहुली
नटली, सजली
मेघमालाहि रंगली

चेतना–कल्पना–मानसी
खेळवि अपूर्व बुध्दि
कल्पना आणि प्रतिभा
जगी अलौकिक शक्ति !

## कल्पना–प्रतिभा

फुलला मोहर कल्पनेचा
सुगंधात तियेच्या
जमला गोंगाट भृंग्यांचा
चराचराला भुलवित होता.

जल–कमळांचा तांडा
होता मैत्रिणीच्या सोबतीला
हसत होता चंद्र नभा
लाजत होती कोण चंद्रिका ?

बहर तारुण्याचा अंगी
कल्पना–चंद्रिका लेवुनि
तांडव–नृत्य करीत प्रतिभेशी
फुगडी दोघींची रंगली विश्वी

फुले, फळे, तारे, नक्षत्रे
पसरुनि ही सर्व खेळणी
डाव भातुकलीचा मांडुनि
एकमेकीला चिडवित होती !

## काळलाटा

अशा आल्या काळलाटा
कशा कल्पना करु आता !
प्राणा प्राणाशी झुंजल्या
अन् काळ–दरबारीच निवाल्या !

स्मृति जागवुनि आल्या
काळजाला घेरून बसल्या
भावना–वज्रलेप कोरिला
नियतिला हरवुनि बसल्या !

कधी कधी गुंजन करतात
वैषम्य-स्मृति जागवितात
किती साठवू, आठवू गूज
विषाद गहन तयांचा

## फुले काव्य

मनाच्या गर्तेत काव्य फुले
आंतडच्यांना पिळ देत उमले
भावना–व्यथांची धून छेडिते
काळाला ही भेदरुन जाते !

नियतिच्या सीमांना उल्लंघते
काळलाटा न जुमानते
चिरंताला चिरंतन बघते
आत्म्याला हळुवारपणे खुलविते !

भाव-पाशांचा,दु:ख–विरहाचा
मोडुनि विरंगुळा, भवपाशांना उल्लंघते
चिरंजीव जीवन नटवित सजते
अढळ अलौकिक पद भूषविते !

# काव्य

गंगा–गीता या
दोन जीवन–लहरी
गंगा–यमुना या
जशा जीवन–प्रवाहिनी

ज्यांनी निर्मिल्या
विश्वी काव्य–लहरी
तेववि‍ल्या विश्व–जीवन–
दीपात दिव्य–ज्योति

योगी–योगिनी, तपि–तपिस्विनी
जपतप अर्चुनि ऋषि–मुनिंनी
भवाच्या शुभारंभी फुलता–
फुलता विश्व–कमलिनी

घोष–वाक्ये ऋषि-मुनिंची
बनली शाश्वत वेद वाणी
मानव नर–रत्ने तोषिली
हर्षिली, स्फुरली, श्रवुनि

२

असते का याहुनि
विश्वात काव्य वेगळे ?
जे निरंतर गुढ, रहस्य
विश्व–कल्पाचे उलगडी

.

वेध–शोध भवाचे घेता
ज्ञानास पूर्णता आली
जी ऋग्, यजुः, साम, अथर्व
वेद आदित सामावली.

# गंगा–गीता

शिरावर धरली गंगा शिव–प्रभूनें
मुखावाटे कथियली गीता श्रीहरीने
गंगा जीवन बनले आम्हा भू-लोकांचे
गीता जीवन बनले सर्व ज्ञानियांचे
गंगेने जीवन फुलविले भू-लोकांचे
गीतेनें जीवन खुलविले ज्ञानियांचे
गंगा झरा झुळझुळ वाहे जीवनाचा
गीता झरा झुळझुळ वाहे ज्ञानाचा

## 'फूल'

फुलतं सहज कल्प-फूल
जीवनाकारास येतं
जीवन-सूर्य प्रकाशितं
चंद्रप्रभा शीतल धरतं

फुलवुन पूर्णत्व शून्यात
सुहास सांडून दूरदूर
पाकळ्या गणिक भाव
विस्तारीत धन्य होतं

भावनांना अमरत्व
देऊन अमर होतं
जीवन–फूल प्रतिबिंब
फूलताच मिटून जातं !

## कल्प–ठाव

तुझा मला ठाव न कळे
स्वप्नातल्या माझ्या कल्पने !
अथांग पसारा युगायुगांचा
विस्तार तुझा क्षितिजाही पलिकडे.

कोणते तूझे गाव ?
कोणते तूझे मूळ ?
कोणते तूझे कुल ?
कोणते तूझे स्वरुप ?

कसे नाही तुला रंगरुप ?
कसे तूझे गुणगान गाऊ ?
कसे तुला मी स्वीकारु ?
कवनातच का मी बांधू ?

कोणत्या फेरात गुंफू ?
कोणत्या शब्दात वाखाणू ?
कोणत्या रीति भाते कथू ?
कसे तव देहामधले वर्णू ?

२

जन्मलीस कोणत्या प्रदेशात ?
गाव सारस्वतच भांडार !
कवनातच अशी जन्मणार ! !
मजशी असाच का संग करणार ?

सांग तुझी रीत भात
कसा ग तुझा देहभान
कोणती तुझी खनी
सांग तुझी कहाणी

मेंदू लव्हाळयातून
झिरपत, झिरपत
लेखणीच्या टोकात
कागदाच्या कप्प्यात

लिलये झरझर येत
घेतेस तू वलयाकार
रंगरुपहीन व्यक्तित्व
इंद्रीयागोचर सत्व

## ३

उसळत, उसळत येणं
सळसळत फैलावणं
हसत, हसत फुलणं
शब्दरुपात फळणं

शब्दा–शब्दानं वाढणं
वट-वृक्षरुप धारण करणं
गगना गवसणी घालणं
युगे युगे चिरंजिव होणं

चित्तथरारक भेदरणं
विश्वा थक्क करुन सोडणं
साहित्यिकाच्या लेखणी–
कोंदणात सहज मोहरणं

सुगंध नसे तवरुपा
थरकाप सुटे क्रुध्दा
भयभित हो राजा
पवित्र तू शब्द–गंगा !

४

उत्तेजन तू कवना
ध्वनि तू मंगलता
ध्वज तू यशता
साक्षात् तू शारदा !

सान-थोरा वंदना
नच तवपुढे विटंबना
स्वरुप तू महिषा !
ऋषि—मुनि वाग्देवता ! !

रसना तू सरस्वती
पूजन तव या लेखणी
आशिश तव असति
हीच मनीषा उरी !

शब्द फुले तव नाभी
शब्द—शरण तव चरणी
हीच माणिक—मोती
चिरंजीव 'भव' सत्कारणी

५

शरद चांदणे शरदाचे
शीतल परिमल हासरे
शब्दागणिक फूल फुले
शब्दांची वाण न पडे

शरद किरणांची कोंदणे
कल्पनें तूझे गोडगोड कडबोळे
सारस्वतात स्वैर विरहणे
रसिकांचे अतिरंजित खुलणे

शारदावीणा झणझणत
कोमल सूर तनतनत
तर कल्पना लयबध्द
रसिक–कोकिल गूंजत

मन–मयूर थयथयत
मेघ–मल्हार गर्जत
दीपक राग आळवत
कल्प–कोकिल गात

४

उत्तेजन तू कवना
ध्वनि तू मंगलता
ध्वज तू यशता
साक्षात् तू शारदा !

सान-थोरा वंदना
नच तवपुढे विटंबना
स्वरुप तू महिषा !
ऋषि–मुनि वाग्देवता !!

रसना तू सरस्वती
पूजन तव या लेखणी
आशिश तव असति
हीच मनीषा उरी !

शब्द फुले तव नाभी
शब्द–शरण तव चरणी
हीच माणिक–मोती
चिरंजीव 'भव' सत्कारणी

५

शरद चांदणे शरदाचे
शीतल परिमल हासरे
शब्दागणिक फूल फुले
शब्दांची वाण न पडे

शरद किरणांची कोंदणे
कल्पनें तूझे गोडगोड कडबोळे
सारस्वतात स्वैर विरहणे
रसिकांचे अतिरंजित खुलणे

शारदावीणा झणझणत
कोमल सूर तनतनत
तर कल्पना लयबध्द
रसिक–कोकिल गूंजत

मन–मयूर थयथयत
मेघ–मल्हार गर्जत
दीपक राग आळवत
कल्प–कोकिल गात

६

मयूर–स्वर स्फुंदत
दशदिशा उन्नत
चराचर तंद्रित
धुंद कल्प–प्रभा बागडत

फवारे दंव बिंदुत
तृण–पुष्पे चिंब
कल्पना खेळात दंग
खुलवि वनश्री नवरंग

काळजाच्या कप्प्यात
दडत, लपत वास
भावना–गर्भ दक्ष
दृष्टि क्षपात प्रसवित

रसरंगाच्या ढगावर
अचल, चपल आरुढ
मेघमालेसह कोसळत
दरी-कपारी लोळत.

७

सुखी–कष्टी भावना
सहज झेलित, झेलित
दृष्टिपंथात तू गोचर
अष्टौप्रहर जागत

नाठाळा लाथा हाणित
सज्जना भूषवित
दुर्जना झिडकारित
सत्व निज जागवित.

कल्पने, नाचत, नाचत
येतेस रसिका पुढं
खचित नसे कल्पना भास
हा तर उद्याचा परिपाक !

कुठे तरी खास मर्म
वसे कल्पनातच वर्म
अगम्य, अविर्वचनीय
दृढभाव हाच ठेवून

## ८

कल्पना सखी खचित
करित दिव्य-भव्य-कर्म
ताडण्या गुणावगुण
फुका विदूषक न लागत

शिरी मोरमुगुट
वर्षित स्वाती जल
शिंपल्यात पळभर
विकसे कल्पना-मौक्तिक

उठता तरंग कल्लोळ
झगझगे कल्पना-तुषार
दिपवित मधुर रूप
कल्प–पुष्प दृढबध्द

मुद्रा हिरांकित 'वाला'
वदत 'रुचिर बोला'
रूपवती करी हितगूज
गुण-रस-पानात भिन्नरस

९

स्पर्शमणि पद्मजा
कलागुणा जयाशा
छंदफंदातही विनया
विनयवती कंठ–मधुरा

मनो रचना रचित
मनहंसा जल–क्रिडेत
धनसुधा वेचित
मोहजाल पसरवित

सौंदर्याची कल्प-कळी
इंदुकला स्वर्गिची
तेजोत्तमा तू नभीची
वेल्हाळिणी त्रिखंडाची

वैराग्याग्नि तू सदाचारिणी
कोपाग्नी दुष्ट-दुर्जनाप्रती
विलास–सरिता–
'कवि कालीदासाची'

## १०

रूपशालिनी गुणखनी
नवरत्नांना पारखणारी
कर्तव्य–लता 'कर्म–योगिनी'
भूषण जीवन-संसारी

सत्कीर्ति–ध्वजा उभारिणी
हुतात्मिनी तू संग्रामी
भूषण–तुरा वीरा शिरी
स्थित–प्रज्ञा दु:खी–कष्टी समयी

ऋषि-सिध्दी तव चरणी
कर्मकाण्ड तू तपस्विनी
शब्द–गंगा कैलास–शिखरिणी
कुंकूम–तिलक सुहासिनी

माया, ममता, सविता
प्रभा, शोभा, कविता
सर्वांभूती तू 'कल्पना'
दिव्यत्वाची 'अंशलता'

११

प्रेमसेवा गुंजारव
उधळित अमृत–मधुर
वंश–वनिता,अंत–रहिता
ललना 'स्वकुल' तारक

सरस्वती माहेर 'कविकुल'
चिरकाल सारस्वत–भांडार
घेसी मान 'कल्पना–पुष्प'
तरच लेखणी कलम–बहाद्दर !

# कल्पना--कृति

कल्पना–शक्ति प्रसवते 'काव्य–सृष्टी'
विद्युल्लतेसम चमकत राहते चारीयुगी

मेघासरशी सळसळत खाली येई
मार्ग न कळे, तर 'ती' मागे फिरून जाई

कल्पना अशी–कशी, कविता करावी कशी
वेळ न माहिती, लहर येई, कविता होई

रंगात रंगली, भावनेत दंगली, कल्प-चतुराई
हळुच मारी पिचकारी कविता होई बावरी

## "कल्पना-विडंबन"

१

'कल्पना'-मैना' कां तुझी दैना ?
राघू-मैना दोन गोटे खाईना !

'कल्पना' चिमणी हिची चिवचिव भारी
दाणे टिपुनि, पाणी पिऊनि भुरकन् जाई

'कल्पना'-ताई मिजास हिला भारी
नाक मुरडीत आपलं धावत जाई

'कल्पना' छोकरी मुळीच नाही भित्री
पदरात पाडिते फुकटात भाकरी

'कल्पना'-कुत्री ही कसली भित्री!
रस्त्यात आपली रंगात येई

'कल्पना' बाई हिला लई घाई
धर्माचं हिला काहीच न्हाई

'कल्पना'-शेजारीण घरात रहातच नाही
पैशा विना हिला मुळी दिसतच नाही

## "कल्पना–विडंबन"

## २

स्फुरली ग बाई स्फुरली
आज 'कल्पना' मला स्फुरली
रागा रागानं फुगुन आली
रंगा रंगानं नटुन उरली.

क्षणात दडली, क्षणात फुलली
झरकन् पळाली, भुरकन् उडाली
ओठात स्फुंदुन सळसळ पळाली
गडबड करूनशान् क्षणात विरली

तोऱ्याचं येणं, नखऱ्याचं जाणं
गळ्यात अडकणं, फशी पाडणं
कथनं, श्रवणं, स्मरणं, कसं पण बोलणं
एक तऱ्हा, दोन तऱ्हा, अनेक तऱ्हा !

## "कल्पना–विडंबन"

३

आज "कल्पना" रंगली ग रंगली
जवळ येऊन पटकन् वसली
बाहुपाशात येऊन पडली
खुदकन् गालात हसली

हिच्या नजरेची रीत लई न्यारी
चटकन् मनात बनली प्यारी
धुंद नयनी खेळे शराबी
झुलते खुषित इष्क–राणी

हिचं बोलणं मंजुळ बोली
सळसळ वाहे अस्खल वाणी
हिची तडफ अस्सल मराठमोळी
वर्णन कराया शब्द पुरत नाही

सळसळे मदनाची पुतळी
खुले 'रंगिन' खेळातिल बाहुली
चाले तर ही गरगर भिंगरी
वाटते घ्यावी हिची फिरकी

आज 'कल्पना' रंगली ग रंगली
इष्काच्या भातुकलीत दंगली
वावटळ कमरेत उठली
गळा चटकन् मिठी पडली !

## 'जाई–जुई कळ्या'

'भावना' 'प्रतिभा'
'कल्पने' च्या कुशी
जन्मल्या दोन जुळ्या
'जाई–जुई कळ्या' !

'कल्पना' विशाल
'प्रतिभा' आकार
'भावना' विन्दू–कण
'बुध्दी'चा त्रिकोण

'कल्पना,' 'प्रतिभा', 'भावना'
विकासनशील त्रिगुण
'बुध्दीत' तिघिंना गुंफूण
रेखिते 'सारस्वत वर्तुळ'

'सत्त्व', 'रज,' 'तम'
'बुध्दी' ची तीन रूपे
आत्म्याशी नाते
पर–ब्रम्हाशी पहाते.

## 'प्रतिभा'

'कल्पना' कुल
मी 'प्रतिभा' फूल
'सारस्वत' वंशकुळ
सानुभव 'मूल'

'कल्पना' वृक्ष
मी फुलते फूल
गोजिरे मूल
कल्पकृति स्वरुप

आभास प्रतिमा
मी झाले 'प्रतिभा'
लेखणी चितारण्या
साहित्यिक उतारण्या

गोफण खेळ 'कल्पने' शी
फेर धरते 'भावने' शी
संपर्क साधिते अनुभूति शी
आकारास आणिते 'नवकृति'

३

वायुसम मी लहर
'कल्पने'शी सदा संग
'भावना' ही दंग
निर्मिते 'कलारंग'

भेंडसावणं खेळ
साहित्यिक शिर
तयास प्रदान
'कलाकृति' वरदान

भावनां ना रंग
कलाकलांना साज
हिरवा शिणगार
खुलता मनाचा रंग

वनदेवता क्रिडता
झुलता झोका
हालता पाळणा
'प्रतिभा' ग्वासा

३

'कल्प–सुधा' सिंचन
'भावना' गाळिते रसार्क
मी ओतिते सुरा नवरस
चतुर भरितो कंठ

मेघमंडल स्वैर फिरण्या
नक्षत्रा गवसणी घालण्या
कलाचतुर टिपण्या
रसिक वाखणण्या

वनश्री विलासण्या
पशुपक्षी गुंजण्या
सरिता हुंकारण्या
ओहोळ कुजण्य

शेज भाव फुलांची
मी नटविलेली
रसिकतेने रंगलेली
प्रीतिने ओथंबलेली

४

मी विकासण्या
'कल्पना' गुंफण्या
'भावना' चितारण्या
कलाचतुर रेखाटण्या

मी खुलण्या
शब्दनक्षी कोरण्या
भावना दर्शविण्या
कल्पना–साज चढविण्या

'कल्प-कुळी' आम्ही जन्मल्या
मानव कुळी नांदल्या
सारस्वतात बहरल्या
औक्षवंत विश्वी बनल्या

चिरायु कलासंपन्नता
धन्य, धन्य 'कल्पना'
अखंड मी, 'प्रतिभा'
'भावना' 'रसना'

५

खेळणे 'कल्पने' शी स्वैर
आणि 'भावना' जोडीस
आम्ही विणितो नवरंग वस्त्र
भरितो कशिदा नवरसरंग

'कल्पना' इंद्रधनु
'भावना' त्यात सप्तरंग
मी ओढिते चाप
क्षितिज धुंद त्यात

येता नव 'कल्प'–वारे
त्यावर मी तरंगते
वायु लहर झुलविते
भावनेस जाग येते

विचारवंत होता जागे
'कल्पतरू' बहरास ये
'प्रतिभा–प्राजक्त' बहरे
'भावना'–सडा पसरे

६

स्वाद पुष्पांचा
साद घालितो आम्हा
आम्ही नाचता, वागडता
जाग येई चराचरा

सृष्टीशी रंगता
डोले 'नाद–ब्रम्हा'
जागे अवखळ 'भावना'
रंग येई कलाचतुरा

विलक्षण क्षण उद्‌भवता
आकार घेई घटना
चिंतनास जाग येता
मी जागते 'प्रतिभा'.

'कल्पना', 'भावना'
संवाद करता
मी 'प्रतिभा–फूल'
घेते आकार

७

शय्येत 'कल्पना' विसावलेली
'भावना' अंतरात दडलेली
मी, 'प्रतिभा' ने भासविलेली
शृंगारमण्यांनी भूषविलेली

प्रेमांकुर फुटता 'भावनेस'
जाग येते 'कल्पनेस'
साद घालिते मला, 'प्रतिभेस'
गोविते मी 'कल्प–भावनेस'

'कल्प–फुल' वाहृयांग
'भाव–फूल' अंतरात
मी, 'प्रतिभा–फूल' दृष्टांत
मोहरते जन–मानस–नयनात

शुभ 'कल्पा' चे तोय
'भाव–वीज' पेर–
मी, 'प्रतिभांकुर'
'प्रतिमा' होय रोप.

८

‘भावनेस’ तडाखा
सहज बसता
उंचावते मी, ‘प्रतिभा’
काढिते ‘कल्पनागळा’

सूर काढता ‘कल्पना’
मी, ‘प्रतिभा’ अन् ‘भावना’
धरितो सूर–ताना
कलानिपुण डोलवितो माना

क्षण ठिबकता
सुख–दु:खांचा
जागे मी, ‘प्रतिभा’
आभास निर्मिण्या

मी कौस्तुभमणि
‘कल्पना’ कंठी
उत्तुंग भद्रा मी
सकृत्दर्शनी

९

मी विलास–सिंधु
'कल्पना' महासागरु
'कल्प–स्वाती' नक्षत्रा
मी स्वातीजल शिंपला

मी 'मुक्ताफळा'
'कल्पना' सागरा
शोधि पाणबुडा
वेचि जवाहिरा

'कल्पना' 'गंगा–यमुना'
मी 'सुजलाम्–सुफलाम्'
फुलते कुशीत बहरात
'सारस्वत–महासागरा'

'कल्पना 'गोदा–भीमा'
मी भ्रमते सैरावैरा
'चंद्रभागा' 'कल्पतटा'
मी लोळिते वाळवंटा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

## १०

कल्पव्रततरु' लाभे
मी, 'प्रतिभा अन् भावना'
फुटता दोन शाखा
'कल्प-वट-वृक्ष' ये आकाश

कामरसरसे 'भावना'
'कल्पना' घेई चुंबना
मला देई आलिंगना
'विचार-गर्भात' मूल ये जन्मा

'विचार-धारा' 'शिखरा'
'कल्पतारा' 'भाला'
मी, 'प्रतिभा' 'नयना'
ती 'भावना' 'हृदया'

'विचार-माला' 'कणत गळा'
'विचार-रचना' ये आकारा
मी, 'प्रतिभा' स्त्रवते धारा
'भावना' चढवि 'अलंकारा'

## ११

'विचार–सर्ग'
'कल्प–गर्भ'
कस्तुरी 'भावनार्क'
मी 'विलास–स्वर्ग'

'विचाराकार' ये शीघ्रता
शब्द गाता 'कल्पना'
क्षण फुलता 'भावना'
वाक्य पूरे करी मी, 'प्रतिभा'

शब्द–शब्द लेखन
भाव-भाव रसरंग
शीर्षक 'कल्प–गंध'
मी, 'प्रतिभा' आशय

कलाकुसरत 'कल्पना'
मी 'प्रतिभा'–कला
मोहमाया जना
मृगजळ तया

## १२

शोभाधन 'कल्पना'
शोभाप्रभा मी, 'प्रतिभा'
संचार सदा मेघमंडला
धुंडण्या नभी मेधा

'कल्पना' धनवेषा
मोरमुगुट शिरा
विनयवती मी, 'प्रतिभा'
रूपवति, हिरकणी मुद्रा

विलासयुता 'कल्पना'
सुरासेवन मी 'सुगंधा'
'कल्पना' काव्य तनुजा
जनहृदवीणा मी, 'प्रतिभा'

सुरसुखखनि 'कल्प–वाला'
'वदनमणि' मी, 'प्रतिभा'
'कल्पगणा', भवजाला
ज्योत्स्ना, मी गोपगणा

## १३

'कल्पना' संसृति
मी सुख–निधी
वल्लरी सत्कृति
हर्ष निर्झरी, शिरोमणि

मी, 'मोहना' कलाचतुरा
बागडते रसिक मना
सम्राज्ञी अलंकारयुता
मोहजाला मोहवि जना

क्षितिज 'कल्पना'
मी सीमा 'प्रतिभा'
परलोक, स्वर्ग 'कल्पना'
इहलोक मी, 'प्रतिभा'

## 'भावना'

'प्रतिभा' भावंड
'भावना' मी मूल
'कल्पना' कुल
'सारस्वत' वंशकुळ

फुले 'कल्पना'–वृक्ष
धरते मी फळ
'कल्पना'–कृति 'भावरस'
सारस्वत 'फलरस'

'प्रतिभा' रसना
मी झाले 'भावना'
लेखणी खुलविण्या
साहित्यिक रंगविण्या

खेळ 'कल्पना'–'प्रतिभे' शी
गोफण फेर अंतराशी
नाते जुळते 'प्रतिभे' शी
नाते जडविते 'कल्पने' शी

२

मानव हृदय
अखंड सागर
मी मासोळी
खेळे जलाशयात

भाव–कण उडवित
फेके प्रभा वरवर
सोनियाचे किरण
शोभवि ज्ञानियांचे घर

दिपवुनि नजर-सृष्टी
पाही कोणी विभूति
बसे भावदर्या काठी
घेऊनि हाती लेखणी

वाङमय पिठीका बसुनि
साहित्यिक–कोळी
पसरी लेखन जाळी
वेचि भाव–मुक्ता जळी

३

कोणी यावं, कोणी जावं
माखुनि भावगंधानं
'भावना' प्रधान लिहावं
भावाविना कसं लिहावं ?

शब्दा–शब्दात गुंफुनि
सुंदर भाव–मुक्ता
घडवुनि हार मोत्यांचा
चढवि रसिका गळा

भावगुच्छात मी 'भावना'
सदैव नांदते मानव–समाजात
अविनाशी मी अखंड विश्वात
तसेच स्वैर खेळते तिन्ही लोकात

भाव फुलता एका क्षणात
मुरता तो हृदयात
भावशिणगार मनात
कोलाहल माजे जनात

४

सागरगोटी तळाशी
भावतरंग वरती
अनेक तरंग कल्लोळ
घेति आवर्तन वलय

एक भाव, एक 'भावना'
जल–तरंग 'कल्पना'
जल–तुषार 'प्रतिभा'
ओलसर मी 'भावना'

हिरवं लव्हाळं 'कल्पना'
लव्हाळं-फूल 'प्रतिभा'
लव्हाळी नम्रता मी 'भावना'
विचार–सरिता कुशी घेई आम्हा

मी गुंफिते काव्य-गुच्छ
बांधिते 'भावना' मालेत
विरहते जनसमुहात
स्फूर्ति मातें वरदान

५

जे, जे घडते, ते, ते गुंफिते
शब्दमण्यात ओविते
म्हणतात 'मी कविता करते'
'भावना-प्रधान' काव्य ते !

भयप्रद, आक्राळविक्राळ रूपे
चितारिते, भव्य, उदात्त स्मृति जागविते
कधी हास्यमय चित्र रंगविते
तर कधी चित्तथरारक फुलोरा उभविते

मार्मिक, तीक्ष्ण, दुर्मिळ, तरल
नाजुक, कोमल भावविषयांना कथिते
गत-स्मृति, वर्तमान, भविष्यभाव चाळिते
हृदयांना हेलाविते, आतडयांना पिळा देते

जे, जे नजरेच्या टप्प्यात अवलोकिते
आशया निकट सान्निध्यात आणिते
जे, जे निरस ते, ते चविष्ट बनविते
आनंदाने ते, ते बहरात, जोमाने फुलविते

६

झाल्या गेल्या भाव क्षणांना उजळविते
शब्दा–शब्दांत नीटपणे जुळविते
'भावना–प्रधान' कथा रचिते
'काव्यमय' स्वरूपात वर्णिते

सुख–दुःख, इष्ट–अनिष्ट भावकण
भावना प्रेरित मालेत गुंफिते
नयनरम्य, सुखद भावांकिता सजविते
विस्मयजनक 'भावहारा' माळिते.

नाजुक– साजुक, सुरस–निरसा
भावगुणांना शिंपिते, उगविते
आनंदवल्लरी गोड फुले–फळे फुलविते
चव चाखुनि मुख–कमल गोड हसविते

कामुकता, भावुकता, नाजुकता
पतिव्रता, श्रमशीलता, मधुरता
आत्मियता, क्षमता, निर्भयता
वात्सल्य, चिंता, निराशादित मी वसते

७

प्रत्यक्ष, परोक्ष घटनांची
दख्खल घेऊनि सांगड घालिते
किंमत तयांची अमोल बनविते
दुर्मिळ कलाकृति जना भासविते

मनुष्य–स्वभाव–दोष रेखाटिते
विविध इष्ट-अनिष्ट प्रवृत्तिना चित्रितें
कौतुक स्तंभात तयांना चितारिते
अपेक्षा, उपेक्षा उंचाविते, रंगविते

सान-थोर, सुबक, नाजुक क्षणांना
कधी सहजपणे नटविते, खुलविते
कधी अमर्याद हास्यास्पद विपर्यास करितें
औचित्यपूर्ण रसिक मना रंग साज चढविते

नव्या, नव्या 'कल्पना'
जुन्या, जुन्या 'विषयांना'
'प्रतिभा' साज चढविते
अप्रतिम 'भावना' रंगविते

८

संवादात्मक हेलावुनि सुखावते
क्रुध्द, रौद्ररूपे घनघोर युध्द खेळते
जय-पराजय मिषें लोभावते, ओशाळते
आनंदोत्साह, विदारक दु:खदाह रूपे फोफावते

जाण, ताण, जोर, जोश त्राणावुनि
तगमग, तळमळ हृदयी भावांची
घेऊनि दखल झोंबऱ्या, टोचण्या वाग्बाणांची
सोडिते हेलावुनि हृदये रसिक मनांची

मी स्मरुनि आळविते रोज प्रतिक्षणी
स्वजन, स्वदेश आणि पूर्वज दृढप्रेमी
संदेश, आचार-विचार प्रसवुनि
स्मरण तयांचे जुन्या-नव्या पिढयांना देते

बालक्रिडा, विषय-लीला, जलक्रिडा
नाना चेष्टा, वासना, करमणूका
साधे, सरळ आदरातिथ्य, मेजवान्या
समारंभादित मी मिरवते 'प्रति-रंभा'.

९

अमृतमय, विषयसम घोट
पाजिते मी सदा जना
रेखाटते स्थिति लाजिरवाणी
नीति, अवनीति, केविलवाणी

जर्जर वेदना, आर्तस्वर
गहिवरलेला हुंदका
परवशता, दरिद्रता
उपजत माझ्याच पीडा

दिखाऊ, लखलखाट
तसा फुका झगमगाट
लीनता, विनयता, शीलता
उगमस्थान माझ्याच गर्भात

शरसंधान मी रोविते
संगिन शब्दांची झाडिते
काडसुते भावांची लाविते
मृतदशा जीवांची करिते

## १०

आशेचं किरण मी
दीनोदार, विवशता, मी
सहृदया, सफलता मी
चाड, भान, संधान मी

करार, निर्धार, मानपान,
स्वाभिमान, वैर, प्रेम,
आदर, अनादर, कलह
मीच उभविते पोटात

नाना गुण, कळा, अवकळा
नवरस, नवरंग, भावरस
माझ्यातच समाविल्या
विविध, नाना, भावकळ्या.

अफाटपणा, बेफाटपणा
अवखळपणा, उद्दामपणा,
खेद, दु:ख माझ्याच छाया
वृत्ति, प्रवृत्ति तयांच्या पडछाया

## ११

ध्येयास नवे वळण देते
गतकालास उजाळा आणिते
कालवश प्रभृतिंना स्मरते
चिरकाल इतिहास जागविते

रहस्यमय क्षणांना दडविते
अनुभवांना झिलाई देते
सुरस, रम्य कथा ओविते
गोड ओव्या जात्यावर दळिते

परंपरागत मी चालते
कालाचा ठसा उमटविते
भूतकालाची छाया धरिते
दिव्य–दृष्टी मी निर्मिते

ओजस्विता, तेजस्विता
माझ्यातच निपजतात
प्रौढता अन् प्रगल्भता
कुशीतच खेळतात

## १२

चमत्कृतिजनक शब्दयोजना
तंतोतंत 'भावना' त्मक रचना
डोलतो काव्याचा फुलोरा
अद्भुत मयूर पिसारा

विशेष नवे 'विचार'–प्रवाह
वाहू लागता जोरदार
'भावना' खळखळे जोरात
करिते युग प्रवर्तक शतक.

जुन्या, नव्याला
करिते आत्मसात
आशा–आकांक्षा
फुलविते जोशात

विफलता, विरह उपजता,
अंतःकरण हेलाविणाऱ्या
वेदना अंतरात,
करुनि सोडतात आस्मित

# १३

पृथक भावांना संकलित–
करिते, नव्या स्वरूपात मांडिते
नव्या दृष्टीची 'झालर' चढविते
अभिरुचीचा 'कलश' भरिते

समरस जीवांचे नाटच रंगविते
कधी विजोड व्दयांना खुलविते
'भावना' रस प्रधान बनविते
कधी करुणमय रस चढविते

सुख-दु:खांना वाचा फोडते
मिटल्या कळयांना उमलिते
कधी खुलल्या फुलांना मिटविते
रस विरस न्याय अंगी कारिते

बीजशक्ति, आत्मशक्ति
वैराग्य, साधुत्व, 'मिथ्या-माया'
'कारण आणि कार्य'
'सत्त्व–रज–तमोगुण' मी 'भावना'

# १४

कामिनी, पद्मिनी, मानिनी
मोती, प्रीतिलता, रागिणी
सुखनिधी, कुलाशीला संसृति
'सु–लक्षणा' मी 'भावना'

'कुलाद्भवा' मी 'भावना'
'कीर्ति' उन्नती, दुर्गती,
संप्रती, अभिमती, सन्मती,
तेजोगुणी, मृती, सत्कृति

शृंगार माझा रस
हिरवा माझा न्यारा
नवनवतीचा हिरवा चुडा
रंगायनाचा लव्हाळा हिरवा

व्यंग, अवगुणात हास्य–झरा
संशय'खट' हास्य'तट'
कारंजे उडे पटपट
हास्यरसात मी तुषार

# "विचार"

'विचार' थोर सागरा प्रमाणे
'ओघ 'भावनां'चा त्याप्रमाणे
'कल्पना'-चित्र ओघळा प्रमाणे
'प्रतिभा'-प्रभा वाहे स्फटिका प्रमाणे

'समाज-पोपट' कूंजन करता
अधून-मधून घोषणा देता
'समाज-कोकिळा' साथ देता
देशी समाजाला जाग येता

आवाहन विचार-धारा
कल्पासना सकल जना
भावनोदर फुलतारा
प्रतिभाकुल गगनतारा

विचार-वात चंदन-सुगंध
कल्प-गंध परिमल
भाव विना बापुडवाणा
भाव न्यारा ओथंबणारा

२

स्वयंप्रकाश विचार-तारा
कल्पाकल्पांत स्थिरणारा
युगायुगांना मागं लोटणारा
काळापुढं मान ताठ करणारा

'विचार' 'विचाराविना' बिचारा
'विचार' 'विचारांती' स्वयंमतारा
तळपे मग 'भावना' लखलखाट
फुलवे 'प्रतिभा' मग 'पसारा'

उभवे पिसारा मयूर–'प्रतिभा'
'विचार–'मेधा' वर्षे झराझरा
'कल्प–नगारा' गर्जवि मन–नभा
'भाव'गारा पडती टपाटपा

अज्ञानतेचा घेरा पडला
'स्व–धर्म' बुडाला त्या योगा
पराधनता–भृंगा जडला
घालू तया विचार-घाला

३

सद्‌गुणाविना उपाय नाही
'विचार'तारु वल्हवूं
ज्ञान–सागरा सोडू
पैलतीराला जाऊ

व्यसन–दुर्जन समाज
ज्ञान–तीराने छेदू
कल्याण–निशान उभारु
सौख्य–झेंडा पुन्हा मिरवू

गडावर गड अज्ञानाचे
स्मरुन 'शिवराज' दर्शने
काबिज करु ज्ञान-खड्‌गे
लोळवू 'खानपान' परांचे

अंधारी नांदते चहुकडे
ज्ञान–चांदणी कुठेतरी उगवे
प्रकाश तियेचा पसरे
फैलवि स्वयं-प्रकाश चहुकडे

४

विचार–रवि खुलवि
मानसी कल्पद्रुमा
चंद्र प्रभाहुनि धवल प्रभा
धूसर, धूसर जळमटे जाळी

किरण ज्ञानाचे
नयन 'कल्पने'चे
जाळी अज्ञान खासे
काटे सरति वाटे

विचार–सागर खवळता
ज्ञान–सरिता खवळता फोफावता
समाज-पुरूषास जाग येता
अज्ञान–कूप ढवळून येते.

उगमस्थान नव नेतृत्वाचे
उत्स्फूर्त जीवन थरारते
स्फूर्ति, प्रेरणा नव निर्मितिची
जन्मते विचार-मंथनातुनि

विचार–मूळ कल्याण-केंद्र
मानवहित बीज अंतर्भाव
नित्य संगम वसे उदात्त
विचार-ब्रम्हसूत्र संयम-दृष्टि.

# काव्य–लता

कवन–वेल तुडवू नका
संथ वाढू दे काव्य–पल्लवा
स्वैरपणे तिला नाचू द्या
संगे हसत खेळ खेळू द्या

काव्य-फुला कुसकरू नका
पायदळी तुडवू नका
कवन-रसा गोड मानुनि घ्या
व्यर्थ मना शिणवू नका

प्रीतिची ज्योत मालवू नका
संथ सांगू दे जीवन-गाथा

## कवियित्रीस

तव चाहते वदले, तव काव्या विषयी
थट्टा–मस्करी केली, कविता करावी तुम्ही
मी न कवि न लेखक, परि आहे वाचक
प्रयत्ने काव्य केले, मी स्मरुनि ईश्वरासी

कविता झकास वाटली, तव रसिकासी
कविता पहिली– वहिली गोड लागे त्यांसी
अशिच स्फूर्ति मिळेल कां काव्य करण्याची ?
"काव्य जमेल कां"? प्रश्न बिकट होता मोठा.

'प्रयत्ने करता जरासा सोपा वाटला
"अशिच कवन–फुले बहरतील कां"? प्रश्न पडला
"काव्य–पाखरू तू घेसी भरारी गगनात
शिकव मला उडण्यास विशाल नभात."

गडकरी घ्या हो पुन्हा जन्म तरी–
(कै. रामगणेश गडकरी याच्याच शब्दात श्रध्दांजली)

काठी यष्टीची झेप वैनतयाची
मराठी शाहिरीची मंजुळ ललकारी
महाराष्ट्रभू दे ललामभूत सलामी
गडकरी घ्या हो पुन्हा जन्म तरी!

तुमची कलमेश्वरी जोबनवंती
प्रसवि वाक्चातुर्य, शाहिरी
शब्दावर तवंगणारी शराबी माधुरी
चमकवि नजरेतिल गहिरी चकाकी

काळाचा ठाव घेऊनि बेमुर्वत नाचणारी
ओलांडणारी सीमा काटेरी शिबंदी
हिरे, माणके, पाचू, भूषणें कौतुकाची
ओळख पटवि जातीच्या जीवाशी

सौंदर्य–मोत्यांची मुंडावळ बिनसरांची
डोंगरलाटेच्या वोहल्यावर भाळी शोभली
जोबनवंती घोडदौडीनेच मैदान कापू लागली
थेट राज सिंहासनाच्या पायऱ्या चढू लागली

२

शाहिरी निशा, देहाची दशा
नीटस डोळी–नाकी मातब्बरी
प्रीतिची सृष्टी खुलवू लागली
ओवाळी जीवाची मीठ मोहरी

अबलखवारू वरती रणशूर सर्जेरावी
कीर्तिचा पवाडा गाई कोकिळ राजेश्वरी
ठाणबंद तीराच्या तडफेने सुटे केशर-कस्तुरी
पंचकल्याणी घोड्यावर रूपरेखी साठवण कि राजहंसिणी !

## 'गडकरी कमलेश्वरी'

गडकरी कलमेश्वरी
शाहिरी खड्ग तरी
काटेरी लेणी कोरी
सह्यगिरी नवल वाणी

सोळा शिणगाराची ठिणगी
शिलगी नवकांती पदराखाली
धरणीकंपायमान नवती उरी
पदर लाज पालवी नवती बावरी

लज्जेने मुरके मारणारी
यौवनी बहार कमलेश्वरी

('हार मोगऱ्याचा' कै. गोविंदाग्रज यांच्या कवितेवरुन
जे भाव स्फुरले ते खालील शब्दात गुंफिले )

## वास मोगऱ्याचा

भुलगा – हा वास गोड किती आई ।
नाजुक सुगंध वाही ।। बहुपरी ।।
किती मधुरता आणी ।
मम चित्त हेलावि ।। पहा तरी ।।
किती फुले फुलली
तुच्छ अलंकार त्यापुढती ।। ऐकतरी ।।
भूवरी । जन्म घेऊनि । हुंगावा क्षणभरी ।
किती गोडवी !
जनमते झुलवि । तत्क्षणी ।। १ ।।

आई – स्वगुणाने प्रिय भारी ।
निज कर्तुत्व दावि बाळा ।। त्यापरी ।।
गंधत्वे मिळवि राजसा
शीलत्वे होई बाळा तू ।। सकलापरी ।।
हा उर्जवि जसा जनगाभारा ।
तू हो तसा जनमोगरा ।। निजकरी ।।
यापरी । मर्दुमकी थोडीतरी । गाजविशील तरी ।
झेलतिल तुझिया मना ।
उधळतिल गुलालसुगंध यासम ।। थोडातरी ।।

## ‘गडकरी कमलेश्वरी’

गडकरी कलमेश्वरी
शाहिरी खड्ग तरी
काटेरी लेणी कोरी
सह्यगिरी नवल वाणी

सोळा शिणगाराची ठिणगी
शिलगी नवकांती पदराखाली
धरणीकंपायमान नवती उरी
पदर लाज पालवी नवती बावरी

लज्जेने मुरके मारणारी
यौवनी बहार कमलेश्वरी

('हार मोगऱ्याचा' कै. गोविंदाग्रज यांच्या कवितेवरुन
जे भाव स्फुरले ते खालील शब्दात गुंफिले )

## वास मोगऱ्याचा

मुलगा – हा वास गोड किती आई ।
नाजुक सुगंध वाही ।। बहुपरी ।।
किती मधुरता आणी ।
मम चित्त हेलावि ।। पहा तरी ।।
किती फुले फुलली
तुच्छ अलंकार त्यापुढती ।। ऐकतरी ।।
भूवरी । जन्म घेऊनि । हुंगावा क्षणभरी ।
किती गोडवी !
जनमते झुलवि । तत्क्षणी ।। १ ।।

आई – स्वगुणाने प्रिय भारी ।
निज कर्तुत्व दावि बाळा ।। त्यापरी ।।
गंधत्वें मिळवि राजसा
शीलत्वे होई बाळा तू ।। सकलापरी ।।
हा उर्जावि जसा जनगाभारा ।
तू हो तसा जनमोगरा ।। निजकरी ।।
यापरी । मर्दुमकी थोडीतरी । गाजविशील तरी ।
झेलतिल तुझिया मना ।
उधळतिल गुलालसुगंध यासम ।। थोडातरी ।।

('तीन तरी' कै. गोविन्दाग्रज यांच्या कवितेवरुन
ज्या 'तरी' स्फुरल्या त्या खालील शब्दात वर्णिल्या)

## किती 'तरी'

फिर मागे रे दुर्दैवा, आतातरी । कां असाच पिडशी परोपरी ?

पाय घसरुनि अपयश पदरी । पुन्हा यश येणे कधीतरी ?
सांगशिल कां आतातरी  की केव्हांतरी ?

रवि सौभाग्याचा मावळता । पुन्हा उगवणे शक्यतरी !
सांग उगवेल पुन्हा केव्हातरी । की सदैव भासतरी !

पिचली बांगडी सांधणे फोलतरी । घडेल कां कधीतरी ?
शक्य जरी, सांग कसेतरी, कुणीतरी, कुठेतरी, त्रिकालीतरी !

बाळ घेऊनि काळ गेला । पुन्हा जागविणे कुणा शक्यतरी !
सांगा कुणीतरी, कसातरी, कशापरी, कधी घडेलतरी ?

झेंपावुनि गेली कल्पना जरी  पुन्हा येणे कधीतरी
स्मरणाविना जमेलतरी । सांगा कसे तेतरी, कुणीतरी

भावना रुतली खोल हृदयी । कोणी पुसेलतरी, कसेतरी
सांगा शक्य आहेतरी, जमेलतरी  ? की अधिक खोल रूतेलतरी !

२

प्रतिभा निमाली एक दाजरी । पुन्हा फुलणे जमेलतरी
तीच शान–शोभा अलेल कां कधीतरी । तीच विकासनशीलता पुन्हा लाभेलतरी !

सांगा असे घडलेतरी, केव्हांतरी । पुन्हा जमेलतरी, सागा कुणीतरी
परोपरी, आतातरी, शक्य होईलतरी । कधी काळी, असेलतरी, ठावेतरी

उन्ह कोवळे रूळे धरतीवरी जरी । त्याला कोंदणे आजतरी
सांगा शक्य होईलतरी, कधीतरी । कुणीतरी, घडेल केव्हातरी !

जरी तरीचे कसे नवल कथावे । सांगा आता कुणीतरी
केव्हांतरी, उद्यातरी, भविष्यकाळीतरी । कल्पना धुंडे संसारी विविध 'तरी' !
मानसी नव्हती 'कल्पनातरी' । सांगा तुमच्या होतीतरी !

# वाट

मम सोबतिण सावली
दुजे कोण नसे संगती
आधार असे पृथ्वी
प्रकाश सूर्य दावि

एकटे येणे जगि
एकटेच जगणे जगि
एकलीच वाट तर ही
चालते आहे 'वाट' आपुली

दु:ख विखुरता ठायी, ठायी
कांटे बोचता पावलो पावली
वाट चाले वाकडी तिकडी
'मार्ग–प्रतीक्षा' कां करिते कधी ?

हृदय नसे हे सांगण्या
अश्रु ढळति ते शमविण्या
मुके बोल विचारती हृदया
'वेडया कां रडतोस उगा ?'

नित्य आचारित निज कर्मी
पालन हेच असे स्व–धर्मा
प्रभु असे वाटाडया सकलां
खंत नको कसली ही तुला !

## लपत, छपत ये ना !

लपत, छपत ये ना
प्रीतिच्या पाखरा !
झुकत, झुकत ये ना

मोहोळ मधाचं आलय भरून
मध त्यांतून लागलाय् झरू
जोडून प्रीतिची रीत
तोडून जन–भित
मन माझे धुंदले ग तव रूपानं
रेशमी तोऱ्यात खेळत ये ना
जरा खुलत, खुलत ये ना

ये, ये मध–पाखरा •
मदाला खुलवित
नव नवतीला रंगवित
नशेच्या मोहात, प्रीतिच्या डोहात
मन माझे धुंदले ग तव रूपानं
गुलाबी नखऱ्यात ये ना
बहरात मदनाला डिवचित ये ना

# ये, ये, कविते ये !

ये, ये, कविते ये !
मंगल–कलश घेऊन ये !
ये, ये, झणी सखे, गडे !

प्रीत–राणी तू सुखाची
माया जडली तुजपाशी
ये, ये, जीवाच्या जीव–राणी !

आनंदाने गाऊ गाणी
सुख–दु:खाची कथु कहाणी
दुमदुमू दे नव यशाची वाणी !

राग, लोभ, व्देष, मत्सर त्यागुनि
जीवन फुलवू आपुल्या संसारी
नको जाऊ दूर दूर क्षण भरी !

भाव मनीचे उमलु दे तव प्रीतित
साथ मिळू दे तव संगतित
वृथा नको चिंता कशाची !

गान स्फुरू दे तव संगतीत
स्वर मिसळू दे तव स्वरात
पाऊल पडू दे तव दरबारी !

# कविता राणी

१

कविता राणी
आपण दोघ
गाऊ गाणी
जगांत नांदू
हसू, बागडू
नाचू, खेळू
सौख्य खुलवू

२

कविता राणी
आपण दोघे
गाऊ गाणी
वनांत हिंडू
आनंदात राहू
झोंके घेऊ
बहरांत येऊ

३

कविता राणी
आपण दोघे
गाऊ गाणी
वसंत फुलवू
सुगंध पसरू
मोदा आणू
धुंदीत राहू

४

कविता राणी
आपण दोघे
गाऊ गाणी
वाऱ्या संगे
नाचत जाऊ
निर्झरा संगे
गात राहू
मळया मळयातुन
वहात राहू

५

कविता राणी
आपण दोघे
गाऊ गाणी
विहंगा संगे
नभात फिरू
ताऱ्या संगे
फेर धरू
चांदण्या संगे
पोहत राहू

६

कविता राणी
आपण दोघे
गाऊ गाणी
उन्मादे आपण–
बेहोश होऊ
पर्जन्या संगे
खाली येऊ
धारा संगे
पाणी सोडू

७

कविता राणी
आपण दोघे
गाऊ गाणी
धरतीला चल
न्हाऊ घालू
शेत मळ्यांना
शिंपित राहू
नव–धान्यांनी
त्यांना सजवू

८

कविता राणी
आपण दोघे
गाऊ गाणी
बाग–मळयांना
पाणी घालू
फुला–फळांनी
त्यांना फुलवू
तृणा संगे
डोलत राहू

## ९

कविता राणी
आपण दोघे
गाऊ गाणी
वायु संगे
वरती जाऊ
दश–दिशांत
नाचत राहू
मौजेत आपण
खेळत राहू.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 21724

REFBK-0021724

REFBK-0021724